MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष विसावे/अंक ५/मे २०१९

## संपादकीय

### "तुजसाठी मरण ते जनन। तुजवीण जनन ते मरण।।"




स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांची १३६ वी जयंती दि.२८ मे २०१९ रोजी जगभर साजरी होत असते. मातृभूमीच्या प्रेमाचा एक ऊर्जस्वल हुंकार म्हणजे सावरकर. इंग्रजांपासून भारताची मुक्तता करण्यासाठी चालवलेल्या क्रांतीकारी चळवळीचे अग्रदूत म्हणून सावरकरांचे योगदान मोठे आहे. चाफेकरांना फाशी झाल्यानंतर वयाच्या कोवळ्या वयात सावरकरांनी मरण येईपर्यंत देशसेवेसाठी आत्मसमर्पण करण्याची प्रतिज्ञा घेतली. सशस्त्रक्रांती, बलोपासना, स्वदेशी इत्यादी विषयांवर सावरकरांची अगाध श्रद्धा होती. लोकमान्य टिळकांना त्यांनी मनोमन गुरू मानलं होतं. सावरकर हे केवळ स्वातंत्र्यवीर नव्हते तर एक उत्तम महाकवी, भाषाशास्त्रज्ञ, भाषाशुद्धीचे प्रणेते, नाटककार, कथा लेखक, वक्ते व दार्शनिक होते.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

सावरकरांची प्रतिभा ही बहुप्रसवा होती. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांनी 'श्रीमंत सवाई माधवरावां'वर फटका लिहिला. वयाच्या १५ व्या वर्षी 'स्वदेशीचा फटका' लिहिला. १९६५ साली प्रकाशित झालेल्या 'समग्र सावरकर वाङ्मय'च्या सातव्या खंडात समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशन समितीच्या प्रकाशक मंडळाने प्रास्ताविकात असं म्हटलं की, 'सावरकरांचे काव्य हे जिवंत प्रतिभेतून निर्माण झालेले असून त्यांच्या कोणत्याही चार स्फूट कविता घेतल्या तरी महाराष्ट्रातील नामवंत कवींत त्यांची अग्रस्थानी गणना होऊ शकेल. त्यांनी अनेक विषयांवर कविता लिहिल्या असून, त्यांच्या सर्वच कविता देशप्रेमाने ओथंबलेली, वीररसनाने भरलेली, प्रतिभेच्या विपुलतेने चमकणारी आणि तत्त्वज्ञान व ध्येयवाद यांचा उद्घोष करणारी असून महाकविच्या कोणत्याही कसोटीवर विचार करता स्वा. सावरकरांना महाकवी हे विशेषण योग्यच ठरते'.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लहानपणापासूनच सर्व धार्मिक ग्रंथांचे डोळसपणे आकलन केले होते. रामायण, महाभारत, पांडवप्रताप, भक्तविजय, हरिविजय आदी ग्रंथांचे त्यांचे विशेष अध्ययन होते. त्यांनी लिहिलेल्या 'कमला' या महाकाव्यासाठी त्यांनी एका विशेष वृत्ताची निर्मिती केली. त्या वृत्ताला 'वैनायक' असे सार्थ नाव त्यांनी दिले. मराठी भाषेच्या काव्यात्म जाणिवेस 'वैनायक' वृत्त हा एक नजराणा आहे. सावरकरांनी तीन संगीत नाटके लिहिली. त्यात 'उःशाप', 'सन्यस्त खड्ग', व 'उत्तरक्रिया' यांचा समावेश आहे. आजही सावरकरांनी लिहिलेली नाट्यपदे मोठ्या रसिकपणे गायिली व ऐकली जातात. 'मर्मबंधातली ठेव ही', 'शतजन्म शोधिताना' ही त्यातील काही विलक्षण सुंदर उदाहरणे.

सावरकरांच्या काव्यप्रतिभेवर 'दैनिक काळ'च्या १० नोव्हेंबर १९५० च्या दिवाळी अंकात मोती उधळले आहेत.

'महाकवी' हे उपपद एखाद्या कवीस दोन अर्थांनी लावतात. ज्याची प्रतिभा उज्ज्वल व जो जीवनाचे भव्योदात्त दर्शन घडवितो तो महाकवी किंवा जो 'महाकाव्य' (Epic) नावाचा काव्यप्रकार रचतो तो. पहिल्या अर्थी शेक्सपिअर, भवभूति, नि बाण यांना महाकवी म्हणतात. दुसऱ्या अर्थी महाकाव्य लिहिणारे टॅसो, माघ, भारवि, श्रीहर्ष इत्यादींना महाकवी म्हणतात. सावरकर या दोन्ही अर्थांनी महाकवी आहेत.'

सावरकरांनी 'गोमांतक' नावाचे काव्य लिहिले. यामध्ये पोर्तुगीजांच्या धर्मवेडापाई हिंदूंचा छळ झाल्याचे हृदयद्रावक वर्णन आहे. या काव्याचा उत्तरार्ध वैनायक वृत्तात आहे. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. स. ग. मालशे यांच्या मतानुसार सावरकरांना वृत्ताच्या हतबलतेची जाणीव सर्वांच्या आधी कितीतरी वर्षे झाली होती व म्हणूनच त्यांनी कविता मुक्तछंदात लिहिण्याचा प्रयत्न केला. स. ग. मालशे म्हणतात –

''मिल्टनसारखी पारंपारिक उपमा रुपके रचावी सावरकरांनीच. त्यांच्या भावना जेव्हा कोमल, अगदी हळव्या बनतात तेव्हा त्यांचे शब्दरूप महाकवीच्या प्रासादिक वाणीप्रमाणे आविष्कृत होते– 'सांत्वन' मधल्या ओव्या किंवा 'कि घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' ह्यासारखे श्लोक व्यास–वाल्मीकींच्या, श्रीधर–मुक्तेश्वरांच्या वाणीसारखे दिव्य आणि

(पृष्ठ क्र. ३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष विसावे/अंक ५/मे २०१९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | |
| २) | स्वदेशवेध-०९: कोकण सहलीच्या निमित्ताने | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची - रंगोत्सव | श्री. प्रकाश दुधाळकर | १४ |
| ४) | लॉर्ड लिटन : ब्रिटिशकालीन भारताचे वादग्रस्त गर्व्हनर-जनरल | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १५ |
| ५) | बघू या थोडं | श्री. चन्द्रशेखर टिळक | २० |
| ६) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | २३ |
| ७) | मानसिक आरोग्य क्षेत्रातील एका 'सा'ची कथा? | प्रा. डॉ. अनिल वर्तक | २६ |
| ८) | वैशाख महिना | डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी | ३१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# स्वदेशवेध-०९: कोकण सहलीच्या निमित्ताने

*कोकण सहलीच्या निमित्ताने पहाण्यात आलेल्या वेगवेगळ्या ठिकाणांच्या माहितीचे संकलन या लेखात दिले आहे- संपादक*

डिसेंबर २०१० च्या ११, १२ आणि १३ तारखांना आम्हा सगळ्यांना वेळ होता. कोकणात सहल करण्याची इच्छा होती. हवामान स्वच्छ होते. म्हणून, (चालका व्यतिरिक्त) १७ आसनी टेम्पो ट्रॅव्हलर गाडी करून आम्ही नऊ जण मजेत कोकण फिरून आलो. त्यानिमित्ताने आमच्या माहितीत जी भर पडली तिचे हे संकलन आहे.

शिवथरघळ (१), लोटे परशूराम (२), गोवळकोट (३), गुहागर (४), हेदवी (५), वेळणेश्वर(६), धोपावे-दाभोळ फेरी बोटीतून खाडीपार(७), आसूद(८), मुरूड(९), वेशवी-बागमांडले फेरी बोटीतून खाडीपार(१०), दिवे आगार(११) आणि हरिहरेश्वर(१२) ही पाहण्याची ठिकाणे निश्चित केली. पाहण्याचा अनुक्रमही तोच ठरवला. कागदावर, तीन दिवसात तो पार पडेल, असा अनुक्रम तयार केला. जाणकारांनी त्यावर असा शेरा दिला की, तुम्ही दहा दिवसांची सहल तीन दिवसांत ठासून भरता आहात. त्यामुळे सहल म्हणजे नुसतीच धावपळ होईल. त्यावर, गरज पडल्यास काही स्थळे सोडून देण्याची मानसिक तयारीही आम्ही केली. पण त्याचवेळी संकल्पित कार्यक्रम कसोशीने पार पाडण्याची तयारीही सुरू केली.

सारा उत्साह एकवटून, ११ तारखेस सकाळी ०६.४५ वाजता डोंबिवलीतून, गणपतीबाप्पा मोरया आणि उंदीरमामा-की-जय, म्हणत आम्ही मार्ग आक्रमू लागलो. नऊच्या सुमारास वडखळ नाक्यावरील गंधर्व उपाहारगृहात नास्ता केला आणि महाडकडे निघालो. पावणेबाराच्या सुमारास, शिवथर नदीच्या किनाऱ्यावरून जात जात, शिवथर घळीपाशी जाऊन उतरलो.

ट्रेक्षितिज संकेतस्थळाच्या शिवथरघळ १ या पानावर असे म्हटले आहे की, हे स्थान रायगड जिल्ह्यात, रायगड डोंगरराशीत, समुद्रसपाटीपासून २९८५ फूट उंचीवर, चहुबाजूंनी हिरव्यागार झाडझाडोऱ्याने झाकून टाकलेल्या डोंगराच्या पोटात वसलेले आहे. समर्थ रामदासांनी हिचे वर्णन 'सुंदर मठ' असे केलेले आहे. ते म्हणतात,

गिरीकंदरी सुंदर वन । सुंदर वाहती जीवन ।<br>
त्यामध्ये सुंदर भवन । रघुनाथाचे ।।

घळीच्या सर्व बाजूंनी उंच पर्वत मालिका असून वाघजई दरीच्या कुशीत हे ठिकाण आहे. काळ नदीचा उगम याच परिसरात होत असून ती पुढे सावित्रीला जाऊन मिळते. तिच्या काठावर कुंभे, कसबे आणि आंबे अशा तीन शिवथर वस्त्या आहेत.

शिवथरघळ आणि आजूबाजूचा सर्व परिसर चंद्रराव मोरे यांच्या जावळीच्या वतनात मोडत असे. ते विजापूर दरबारचे वतनदार देशमुख होते. घनदाट जावळीच्या भूप्रदेशामुळे मोरे वरचढ झाले. पुढे १६४८ मध्ये शिवरायांनी हा परिसर आपल्या हातात घेतला. समर्थ रामदास सन १६४९ मध्ये या घळीत वास्तव्याकरता आले. ते सन १६६० पर्यंत म्हणजे दहा अकरा वर्षे या ठिकाणी राहत होते. दासबोधाचा जन्म याच घळीत झाला. सन १६७६ मध्ये शिवराय दक्षिण-दिग्विजयासाठी जाताना श्री समर्थांचा आशीर्वाद येथूनच घेऊन पुढे गेले. आजच्या

आपण आपल्या मतांचे कमी-अधिक प्रमाणात दासच असतो. - विल्यम हॅजलिट

या घळीचा शोध धुळे येथील विख्यात समर्थभक्त श्री शंकर कृष्ण देव यांनी १९३० साली लावला.

मुंबईकडून चिपळूणकडे, राष्ट्रीय महामार्ग-१७ वरून जात असता, महाड सोडले की पुढे थोड्याच अंतरावर एक रस्ता डावीकडे जातो. तेथे 'शिवथरघळीकडे' अशी पाटी लागलेली आहे. येथून पुढे पारमाची गाव लागते. साधारण ३० किलोमीटर अंतर पार केल्यावर आपण पायथ्याशी पोहोचतो. वाटेत कुंभे शिवथर, कसबे शिवथर आणि अंबे शिवथर ही गावे लागतात. पायथ्यापर्यंत चांगला गाडीरस्ता आहे. मग १०० पायऱ्या चढून गेल्यावर आपण घळीशी पोहोचतो. शिवथरघळीची माहिती मिळवता मिळवता मी समर्थ रामदास २ या संकेतस्थळावर जाऊन पोहोचलो. तिथे मला समर्थांची सुरेख ओळख करून देणारे पाच श्लोक मिळाले. ते असेः

श्री. सद्गुरूस्तवन

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वसिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचे ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।। १ ।।

उपदेश ज्याला असे राघवाचा । श्रवणी जसा गूण परिक्षितीचा ।
विवेकी विरागी जगी पूर्ण तैसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।। २ ।।

करी कीर्तने नारदासारखाची। कदर्यूपरी शांती ज्याचे सुखाची।
जया वाटते कांचनू केर जैसा । नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।।३।।

स्मरणी जसा शंकर की प्रल्हाद । चकोरापरी आठवी रामचंद्र।
रमा सेवी पादांबुजे जाण तैसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।।४।।

पृथुसारिखा अर्चनी वाटताहे। खरा अक्रुराच्यासम वंदिताहे।
नसे गर्व काही अणुमात्र ऐसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।।५।।

समर्थांचे यथातथ्य वर्णन करणारे हे पाचही श्लोक सुंदर आहेत. मला तर बेहद्द आवडले. मग प्रश्न हा उभा राहिला की त्यांचा रचयिता कोण असावा? त्यावर मी ई-मेलद्वारे त्या संकेतस्थळाच्या संचालिका सुवर्णा लेले यांना विचारून माहिती करून घेतली. त्या श्लोकांची भाषा इतकी मनाच्या श्लोकांसारखी आहे की जणू काय ते स्वतः समर्थांनीच रचलेले असावेत. म्हणून त्यांच्याच निकटच्या कुणी शिष्याने ते लिहिले असावेत अशी अपेक्षा होती. हे सर्व श्लोक वाचण्याआधी मात्र मला केवळ पहिलाच माहीत होता. श्लोकांचा रचयिता उद्धवसुत आहे असे त्यांनी उत्तर दिले. हा उद्धवसुत म्हणजे श्री समर्थ रामदास स्वामींचा पहिला शिष्य उद्धव आहे असेही सांगितले. मात्र, थोड्याच दिवसांत त्यांनी पुन्हा एकदा मला ई-मेल करून माहिती दिली की, मी आपल्याला लिहिले होते की समर्थ शिष्य उद्धव या श्लोकांचा रचयिता आहे, पण ते जरा चुकले आहे. शंकर श्रीकृष्ण देव यांच्या, श्री समर्थ अवतार या पुस्तकात असे दिले आहे की, हे उद्धवसुत म्हणजे टाकळीचे उद्धव नाहीत. यांची वंशपरंपरा अशी आहे. त्रिंबक-मल्हारी-उद्धव-उद्धवसुत लक्ष्मण अशी. यांची गुरू परंपरा अशी आहे: श्रीसमर्थ-माधव-केशव-उद्धवसुत. यावरून उद्धवसुत १६३० ते १७०० या काळात असावेत. त्यांनी श्री समर्थांचे चरित्र लिहिले त्यातील हे श्लोक आहेत. या ग्रंथाचे ५१ अध्याय आहेत व ओवी संख्या चार हजार आहेत. - सौ. सुवर्णा लेले. पुढे जेव्हा श्री समर्थ सांप्रदायिक दैनंदिन उपासना हे पुस्तक शिवथरघळीत गेल्यावर, सुंदरमठ पुस्तकालयातून विकत घेतले तेव्हा खालील आणखीही तीन श्लोक त्यात समाविष्ट असल्याचे आढळून आले, आणि मक्त्यावरून रचयिता उद्धवसुत असल्याचेही लक्षात आले.

जनतेच्या मताइतकी चंचल गोष्ट दुसरी नाही. - हॅजलिट

खरी भक्ती त्या हो जगी मारुतीची । असे रामदासा परी मारुतीची ।
नसे भेद दोघां जळी गार जैसा । नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।। ६ ।।

जये अर्जुनासारिखे सख्य केले । मुळींहूनिया द्वैत निःशेष केले ।
सितानायकू दृढ केला कुवासा । नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।। ७ ।।

बळीं आत्मनीवेदनी पूर्ण झाला । विदेहीपणे दास तैसा मिळाला ।
म्हणे उद्धवसुत वर्णूं मी कैसा । नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।। ८ ।।

तुझा भाट मी वर्णितो रामराया । सदा सर्वदा गाय ब्रीदे सवाया ।।
महाराज दे अंगिंचे वस्त्र आता । बहू जीर्ण झाली देहेबुद्धिकंथा ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

शिवथरघळीत, रामदासांचे घळीतील धबधब्याविषयीचे काव्यही एका फलकावर लिहून ठेवलेले आहे. ते खालीलप्रमाणे आहे.

गिरीचे मस्तकी गंगा । तेथुनि चालली बळे । धबाबा लोटती धारा । धबाबा तोय आदळे ।।१।।

गर्जता मेघ तो सिंधू । ध्वनीकल्होळ ऊठिला। कड्याशी आदळे धारा । वात आवर्त होतसे ।।२।।

तुषार उठती रेणू । दुसरे रज मातले । वात मिश्रित ते रेणू । सीत मिश्रित धूकटे ।।३।।

दराच तुटला मोठा । झाड खंडे परोपरी । निबीड दाटती छाया । त्या मधे वोघ वाहती ।।४।।

गर्जती श्वापदे पक्षी । नाना स्वरे भयंकरे । गडद होतसे रात्री । ध्वनी कल्लोळ उठती ।।५।।

कर्दमू निवडेना तो । मानसी साकडे पडे । विशाळ लोटती धारा । ती खाले रम्य वीवरे ।।६।।

विश्रांती वाटते तेथे । जावया पुण्य पाहिजे । कथा निरुपणे चर्चा । सार्थके काळ जातसे ।।७।।

– समर्थ रामदास

ह्यावरून, आम्ही तेथे जाऊन पोहोचलो, त्याअर्थी नक्कीच पुण्यवान असलो पाहिजे. तेथे दररोज १२ ते १३:३० प्रसादाची व्यवस्था असते. प्रसादात आम्हाला गरमागरम खिचडी आणि शिरा मिळाला. खिचडी हवी तेवढी देतात. ही व्यवस्था भक्तगणांनी दिलेल्या देणग्यांतून साधली जाते. मग आम्ही परशुरामला निघालो.

लोटे परशुराम या गावाजवळील फाट्यावर परशुरामाचे मंदिर आहे. मुंबई–गोवा महामार्ग क्रमांक–१७ वर, मुंबईकडून गोव्याकडे जात असता, चिपळूण या गावाच्या आधी सुमारे ८ किलोमीटर अंतरावर, डाव्या फाट्यावर हे मंदिर आहे. पुढे परशुरामाचे देऊळ व मागे त्यांच्या आईचे, रेणुकादेवीचे मंदिर आहे. जवळच वसिष्ठी नदी आहे व महेंद्र पर्वत आहे. परशुरामांनी एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून, ब्राह्मणांना दान दिली. त्यामुळे त्या जागेत स्वतः राहणे उचित नाही असे समजून, स्वत: राहण्यास जागा उरली नाही म्हणून, परशुरामाने समुद्रात बाण मारून कोकणच्या भूमीची निर्मिती केली असे मानले जाते. या भूमीस ‘अपरांत’ असेही म्हणतात. अपर म्हणजे पश्चिम, तिचा अंत असलेली जमीन म्हणून अपरांत. त्यांचेबद्दल असे म्हटले जाते की :

अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरंधनुः ।
इदं ब्राह्मं, इदं क्षात्रं, शापादपि शरादपि ।।

म्हणजे

मुखोद्गत वेद चारी, चापबाण पाठीवरी ।
हाच ब्राह्म, हाच क्षात्र, पुरुषोत्तम भूवरी ।।

परशुराम मंदिरासमोरच्या कासवाचे हे प्रकाशचित्र आहे.



कासव आपले चारही पाय आणि मान व शेपूट असे सहाही अवयव, धोक्याची जाणीव होताच, पोटात ओढून घेते. त्याचे प्रमाणेच, भवसागरात तरायचे तर काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या षड्रिपूंना काबूत आणण्याची कला आत्मसात करण्याचा संदेश, हे गर्भगृहासमोरील कासव भक्तगणांस देत असते. श्री क्षेत्र परशुराम ३ या संकेतस्थळावर असे म्हटले आहे की, मुख्य गाभाऱ्यात परशुरामाच्या मूर्तीच्या उजव्या हाताला 'काम' आणि डाव्या हाताला 'काळ' देवाची मूर्ती आहे. काळ आणि काम ह्या दोन्हींवर विजय मिळविणारे परशुराम असा त्याचा आशय आहे.




चिपळूण नगरपरिषद ४ या संकेतस्थळावरही परशुरामाची सविस्तर माहिती मिळू शकते. परशुराम मंदिराच्या आसपास पुजेच्या साहित्याची खूप दुकाने आहेत. मात्र आश्चर्य या गोष्टीचे वाटले की, फुलांचे दुकान एकही नाही. आम्हाला गोवळकोटातील आमच्या कुलदेवतेकरता -करंजेश्वरीकरता- आम्ही फुलांच्या शोधात होतो, कारण तिथेही फुले सहजी मिळत नाहीत अशी माहिती आम्हाला आधीच मिळालेली होती. म्हणून परशुरामला असताना फुले शोधली. पण इथेही निराशाच पदरी पडली. मग आम्ही गोवळकोटकडे निघालो.



चिपळूण शहराच्या वायव्येस, वासिष्ठी नदीत एक निसर्गसुंदर बेट आहे. त्या बेटावर गोवळकोट किल्ला आहे. किल्ल्यावर देवी करंजेश्वरी आणि देव सोमेश्वर यांचे सुंदर मंदिर आहे. त्यामुळे परशुरामवरून जर करंजेश्वरीस जाऊन मग गुहागरला जायचे असेल तर चिपळूण शहरात जाण्याची गरजच उरत नाही. मंदिराच्या बाजूच्या डोंगरावर गोवळकोटचा बालेकिल्ला आहे. वर दोन तोफा आणि ध्वजस्तंभही आहेत.

त्यांचेभोवतीची तटबंदीही भग्नावस्थेत का होईना पण अस्तित्वात आहे. तेथवर, बांधलेल्या चार-पाचशे पायऱ्यांची सुंदर वाट आहे. वरून संपूर्ण वसिष्ठी नदीच्या खोऱ्याचे विहंगम दृश्य नजरेच्या टप्प्यात येते.डावीकडे दिसत आहे गोवळकोटच्या बालेकिल्ल्यावरून काढलेले गोवळकोट गावाचे प्रकाशचित्र. त्याचेखाली देवी करंजेश्वरीची मूर्ती दिसत आहे. वरून काढलेल्या प्रकाशचित्रात, मंदिरसंकुल, मंदिराचा कळस आणि पाठीमागे किल्ल्याखालच्या गावाचा काही भाग दिसत आहे. ही देवी चितळ्यांची देवी म्हणूनही ओळखली जाते. ती आमचीही कुलस्वामिनी आहे. दोन खोल्यांचा सुसज्ज भक्त-निवास, विस्तीर्ण आवार आणि हिरवागार परिसर यांच्या कोंदणातले हे मंदिर प्रेक्षणीय आहे. उद्या

गुहागरवरून धोपावे धक्क्यावर जाऊन, वसिष्ठी नदीचे मुख असलेली धोपावे-दाभोळ खाडी ओलांडून, आम्ही दापोलीस जाणार होतो. तो भाग पुढे येईलच.



आता आम्ही गोवळकोटच्या करंजेश्वरीस पोहोचलो होतो. बाजूच्या चित्रात डावीकडे मंदिर संकुलाचे प्रवेशद्वार दिसत आहे, तर उजवीकडे देवी करंजेश्वरी आणि देव सोमेश्वर यांचे देखणे मंदिर. संध्याकाळी सातच्या सुमारास आम्ही गुहागरकडे रवाना झालो.



दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही गुहागरच्या समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारला. नास्ता करून हेदवीच्या गणपतीला गेलो. छोट्याशा हिरव्यागार टेकडीवर वसलेले हे टुमदार मंदिर प्रेक्षणीय तर आहेच, मात्र कमालीचे शांत आणि ध्यानधारणेस पोषक आहे. इथे आम्हाला बामणघळ या इथून चार-पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या समुद्रा-लगतच्या ठिकाणाची माहिती मिळाली. आम्ही तिथवर गेलो. तिथे बराच वेळ रमलो, त्यामुळे पुढल्या भरगच्च कार्यक्रमात उशीर-उशीरच होत गेला. हे स्थळ मात्र नाम बडे दर्शन खोटे प्रकारचे निघाले. इथेही खूप सुंदर निसर्गशिल्पे पाहायला मिळतात.

तरीही जर पुढे हरिहरेश्वर पाहायचा कार्यक्रम असेल तर, बामणघळ पाहिली नाही, तरीही काही बिघडत नाही. हे ज्ञान, अर्थातच आम्हाला दोन्हीही स्थलदर्शने झाल्यानंतरच पदरी पडले. नंतर आम्ही वेळणेश्वरला गेलो. इथल्या किनाऱ्यावर समुद्री लाटांत खूप खेळलो. किनाऱ्यावरीलच एका उपाहारगृहात जेवलो आणि मग गुहागरच्या दिशेने कूच केले. गुहागरला सामान घेऊन लगेचच धोपावे-धक्क्याकडे रवाना झालो.



धोपावे-दाभोळ (सुमारे १ किलोमीटर रुंदीच्या खाडीतील) फेरी-बोट-सेवेचा उपग्रह-देखावा




सुवर्णदुर्ग शिपिंग कंपनीची, दापोली आणि दाभोळ तालुक्यांना परस्परांशी जोडणारी फेरीसेवा, ८०-८५ किलो-मीटरचे हे अंतर, धोपावे आणि दाभोळ दरम्यानची एक किलोमीटर खाडी पार करून दहा मिनिटांत संपवते. त्याचप्रमाणे मंडणगड आणि श्रीवर्धन तालुक्यांना परस्परांशी जोडणारी फेरीसेवा, वेसवी-कोलमंडले दरम्यानची एक किलोमीटर खाडी पार करून दहा मिनिटांत

लहानसहान संधींमुळेच मोठमोठाली साहसे हातून घडत असतात. - डेमोस्थेनिस

संपवते. यामुळे वेळ, पैसा, इंधन आणि मनुष्य-तास वाचवून माणसांचे जीवन सुखी करते. या भागात विहार करणारे आणि आडरस्त्यात अडकून पडणारे पर्यटक, आता वाहनांसकट फेरी बोटीतून सत्वर प्रवास करण्याचा थरारक अनुभव घेत आहेत. सुवर्णदुर्ग शिपिंग कंपनीचे संकेतस्थळ ५ या फेरी-बोट-सेवेची संपूर्ण तपशीलात माहिती पुरवते.

डॉक्टर चंद्रकांत मोकल आणि डॉक्टर योगेश मोकल या दोन द्रष्ट्या माणसांनी सुवर्णदुर्ग शिपिंग अँड मरीन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड दापोली नजीकच्या छोट्या शहरात सुरू केली. त्यावेळी दोघेही वैद्यकीय क्षेत्रातील यशस्वी व्यावसायिक होते. दाट लोकवस्तीच्या भागात जाऊन व्यवसाय करणे त्यांना सहज शक्य होते. त्यांनाही वाहतुकीच्या साधनांअभावी स्थानिक सामान्य माणसांप्रमाणेच खडतर प्रवास करावे लागत. एक किलोमीटर खाडी पार करून जाण्याकरता त्यांना दोन ते तीन तासांचा प्रवास अवघड रस्त्याने करून जावे लागे. म्हणून एके दिवशी त्यांनी दाभोळ येथे फेरी-बोट-सेवा सुरू करण्यात पुढाकार घ्यावा असा निर्णय घेतला. हे काम सोपे नव्हते. मात्र त्यांच्या द्रष्टेपणामुळे आणि कामावरील दृढ निष्ठेमुळे हे साध्य झाले. आज तीन वर्षांच्या कालावधीतच वेसविला, दुसरी अशीच सेवाही सुरू झालेली आहे. शेकडो लोक दररोज या सेवांचा लाभ घेत आहेत.



आता आमची टेंपो ट्रॅव्हलर धोपावे धक्क्यावर जाऊन उभी राहिली खरी, पण त्याचवेळी समोरच्या काचेतून, सोनिया नावाची ती फेरी बोट दाभोळच्या किनाऱ्याकडे झेपावलेली होती. पुढली फेरी १६.०० वाजताची. तीसुद्धा सोनिया परत येईल तेव्हाच. मग तिकीट काढले. चहा पाण्याची सोय पाहावी असा प्रयत्न केला. पण व्यर्थ.

व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि सामानाची खाडीपार, सत्वर, सुलभ, ने-आण; प्रवासी मार्गदर्शन, तसेच दोन्ही-कडच्या धक्क्यांवर प्रवासी निवारे, पेयजल, सुविधागृहे, वीज, तिकीट खिडक्या, प्रथमोपचार, उपाहारगृह, एस.टी.डी.बूथ, वर्तमानपत्रे व नित्योपयोगी सामानाची दुकाने ठेवू असे आश्वासन त्यांच्या संकेतस्थळावर दिलेले आहे. या त्यांच्या आश्वासनांपैकी प्रथमोपचार, उपाहारगृह, एस.टी.डी.बूथ, वर्तमानपत्रे व नित्योपयोगी सामानाची दुकाने या शेवटल्या चार सोयी प्रवासादरम्यान आम्हाला दिसून आल्या नाहीत. इतर सेवा सुरळीत व व्यवस्थितपणे कार्यरत असल्याने आम्हाला या अद्भूत प्रवासाचा अविस्मरणीय अनुभव घेता आला.

धोपावेच्या फलाटाला सोडून मार्गस्थ होताच सोनिया १८० अंशात वळली. तिने फलाट दाभोळच्या किनाऱ्याकडे वळवला. मग ती वेगाने वाट चालू लागली. तिच्यात एक मालवाहू ट्रक आणि काही लोक प्रवास करताना दिसत आहेत.

चारच्या सुमारास सोनिया परतून आली. आम्ही आतुरतेने वाटच पाहत होतो. तिचा फलाट धक्क्याला लागताच वाहने भराभर बाहेर पडू लागली. काही मिनिटांतच बोट रिकामी झाली. नवी वाहने धक्क्यावर रांगा लावून उभीच होती. ती एक एक करून बोटीत चढू लागली.

मग आमचे वाहन आणि आम्ही, सगळेच बोटीवर स्वार झालो. दाभोळच्या धक्क्यावर पोहोचताच आम्ही उतरलो. वाहनात स्थानापन्न झालो आणि दापोली मार्गे आसूदची वाट चालू लागलो. आसूदच्या व्याघ्रेश्वर




मंदिरात, व्याघ्रेश्वराचे दर्शन घेतले आणि मग आसूद ते बाणकोट प्रवासादरम्यानच्या मुरूड गावात आमच्या बहिणीच्या सासरचे कुलदैवत, श्री दुर्गादेवीचे मंदिर आहे ते पाहण्याच्या निमित्ताने आम्ही वाहनातून पायउतार झालो आणि गाडीच्या दारासमोरच आम्हाला महर्षी कर्वेंचा पुतळा दिसला.

दुर्गेचे यथासांग दर्शन घेतले. मग समजले असे की, ते गाव तर कर्वे यांचेच मुरूड होते. महर्षी धोंडो केशव कर्वे ६ या पानावर त्यांचे संक्षिप्त चरित्र दिलेले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे हे स्त्री-शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ आणि एका शतकातील सामाजिक व राजकीय घडामोडींचे मूर्तिमंत साक्षीदार होते. महर्षी कर्वे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील शेरवली येथे झाला. त्यांना सामाजिक कामाची आवड त्यांचे गुरुजी सोमण मास्तर यांनी लावली. त्यांचे इंग्रजी तीन इयत्तांचे शिक्षण मुरूडला झाले.

पुढील चित्रात दिसते आहे ती त्यांचीच शाळा. त्यापुढील शिक्षणासाठी ते मुंबईच्या 'रॉबर्ट मनी हायस्कूल'मध्ये दाखल झाले. पाचव्या, सहाव्या व सातव्या इयत्तेत त्यांना शिष्यवृत्ती मिळाल्या. शाळेत असल्यापासूनच ते शिकवण्या करीत. त्यांची गणित शिकवण्यात ख्याती होती. १८८४ साली बी.ए.च्या विद्यार्थ्यांत ते गणितात पहिले आले होते. सकाळी साडेचारला त्यांचा शिकवण्याचा कार्यक्रम सुरू होई. घरी आल्यानंतर रात्री ते पत्नी राधाबाईंना शिकवीत. राधाबाईंच्या मृत्यूनंतर पुनर्विवाह करायचाच तर विधवेशीच करायचा, असे त्यांनी ठरविले. आपले स्नेही नरहरपंत यांची विधवा बहीण गोदूबाई हिच्याशी त्यांनी लग्न केले. या गोदूबाई म्हणजे पंडिता रमाबाईंच्या शारदा सदनमधील विधवा-विद्यार्थिनी होत.

१८९१ मध्ये त्यांनी फर्ग्यूसन कॉलेजात गणित शिकवायला सुरुवात केली. पुढे सुमारे २३ वर्षे त्यांनी फर्ग्यूसनमध्ये अध्यापनाचे कार्य केले. विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी 'विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी' स्थापन केली. या संस्थेच्या फंडाच्या व्याजाचा उपयोग पुनर्विवाहेच्छू विधवांच्या मदतीसाठी केला जात असे. १ जानेवारी, १८९९ रोजी त्यांनी पुण्यात 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेच्या कार्याची सुरुवात केली. याच संस्थेला पुढे 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्था' म्हणून ओळखले जाऊ लागले. आज ही संस्था 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था' म्हणून सुपरिचित आहे. १९०० साली महर्षी कर्वे यांनी आश्रमासाठी पुण्याजवळ हिंगणे येथे एक झोपडीवजा घर बांधले. येथेच त्यांनी स्त्री-शिक्षणाच्या कार्याची सुरुवात केली. १९०७ साली त्यांनी 'महिला विद्यालया'ची स्थापना केली. या विद्यालयात बालसंगोपन, आरोग्य, गृहजीवन शास्त्र आदी विषयांचे प्रशिक्षण महिलांना दिले जात होते. बदलत्या काळानुसार व गरजांनुसार कर्वे यांनी पुढे शिक्षणपद्धतीत व अभ्यासक्रमात अनेक सुधारणा केल्या. म. गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, पं. नेहरू अशा अनेक मान्यवर नेत्यांनी प्रत्यक्ष हिंगणे येथे भेट देऊन महर्षी कर्वे यांच्या कार्याची प्रशंसा केली होती.



१९१४ साली फर्ग्यूसन कॉलेजमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांना सारा वेळ आश्रम आणि महिला विद्यालयाकडे देता येऊ लागला. १९१६ साली त्यांनी जपानच्या धर्तीवर महिला विद्यापीठाची स्थापना केली.

हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ मानले जाते. या विद्यापीठाच्या महाविद्यालयाचे कर्वे हे पहिले प्राचार्य झाले. पुढील वर्षी शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या विद्यालयाची त्यात भर पडली. या विद्यापीठाचे पुढे 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ' (एस.एन.डी.टी.विद्यापीठ)' असे नामकरण करण्यात आले. या विद्यापीठात शिक्षणाचे माध्यम मराठी होते. परंतु इंग्रजी या ज्ञानभाषेचे शिक्षण, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण आदी विशेष अभ्यासक्रमही विद्यापीठात शिकवले जात असत.

खेड्यातील महिलांना शिक्षित करण्याच्या कार्याकडेही अधिक लक्ष द्यायला हवे असे ठरवून त्यांनी 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' नावाची संस्था उभी केली. समाजामध्ये समता यावी, अस्पृश्यतेचे निर्मूलन व्हावे या उद्देशाने त्यांनी तीनशे समविचारी सहकाऱ्यांना बरोबर घेऊन १९४४ साली 'समता संघ' स्थापन केला. स्थापन केलेल्या संस्थांना त्यागी वृत्तीने सामाजिक कार्य करणारे कार्यकर्ते मिळण्यासाठी त्यांनी कार्यकर्ते घडवणाऱ्या 'निष्काम कर्म मठ' या संस्थेची स्थापना सुरुवातीलाच केली होती. अल्बर्ट आइन्स्टाइन, मादाम माँटेसरी, रवींद्रनाथ टागोर या विद्वानांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. १९४२ साली बनारस हिंदू युनिव्हर्सिटीने त्यांना मानद पदवी देऊन त्यांचा सत्कार केला. १९५५ साली त्यांना पद्मविभूषण सन्मान देऊन गौरविण्यात आले. १९५८ साली, वयाच्या शंभराव्या वर्षी त्यांना 'भारतरत्न' हा देशातील सर्वोच्च पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भारतरत्न ही गौरवास्पद पदवी आहे खरीच. पण ती तुम्हा-आम्हा सगळ्यांसाठी. महर्षींना ती पदवी देऊन भारत सरकारने त्या पदवीलाच तो मान मिळवून दिलेला आहे असे मला त्यावेळी वाटले. जिवंतपणीच, उत्स्फूर्तपणे पुतळा घडण्याचे भाग्य ज्या काही व्यक्तींना लाभते, तशातीलच ते एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांची स्त्री-मुक्तीची चळवळ, सामाजिक उत्थानाची त्यांची आसक्ती आणि शतायुषी संपन्न जीवन जगण्याचे त्यांचे रहस्य या साऱ्यांसाठी ते कायमच वंदनीय आहेत. महर्षी कर्वे यांना महाराष्ट्र 'अण्णा' या नावानेही ओळखतो. प्रत्येक क्षण समाजाच्या सेवेसाठी जगलेले अण्णा सुमारे १०५ वर्षांचे कृतकृत्य जीवन जगले.

सुमारे सहा वाजलेले होते. तिथून आम्ही मग बाणकोटला जाणार होतो. पण गाडीत डिझेल भरायला झालेले होते. पुढला मार्ग घाटाघाटांतून, अरुंद रस्त्यांतून होता. कोकणातल्या दुर्गम भागांतून होता. अशा ठिकाणी डिझेल संपून चालणार नव्हते. भरायचे तर नजीक पेट्रोलपंपही नव्हता. चक्रधरास रस्ता माहितीचा नव्हता. मग परत दापोलीला डिझेल भरून, मग केळशी मार्गे पुढे जाण्याचा निर्णय घेतला. रस्ता बरा असला तरीही दिशादर्शक फलकांच्या दुर्भिक्षामुळे रस्ता निश्चित करणे अवघड झालेले होते. वेळ रात्रीची असल्याने प्रत्येक तिठ्या-चौरस्त्यांवर थांबून राहून, मार्गदर्शनाचे उपाय शोधावे लागत. शिवाय, किलोमीटरचे किलोमीटर कुणीही व्यक्ती वा वाहन भेटत नव्हते. पुढे वाटेतले गाव लागल्यावर चौकशी करताच, रस्ता चुकल्याचे समजल्याने मागे फिरावे लागे. असे अनेकदा झाले. सरतेशेवटी ३३ किलोमीटरचे आसूद-बाणकोट अंतर तीन तासात पार करून आम्ही बाणकोटला पोहोचलो, तेव्हा गाडी ८२ किलोमीटर अंतर चालून गेलेली होती. वेशवी-मंडणगड-म्हाप्रळ-आंबेत-तळवडे-कोलमांडले-बागमांडले हा (२८+१७+१+३०+१२+४=९२) ७ कि. मी. अंतराचा फेरा वाचवण्याकरता फेरी-बोटीतून बाणकोटची खाडी पार करण्याच्या आमच्या मनसुब्याची अशाप्रकारे वाट लागली.

वाटेत दिवे-आगारच्या आनंदयात्री या हॉटेलचे मालक श्री. भाटवडेकर यांनी आम्हाला फोनवर सांगितले की, आम्ही मंडणगडमार्गे खाडीभोवती फेरा घेऊन येतो,

तर खूपच लवकर पोहोचलो असतो. शिवाय फेरी बोट अर्ध्या अर्ध्या तासाच्या अंतराने फेऱ्या करते. अशात, बाणकोटला आम्हाला फेरीची प्रतीक्षा करण्याकरता बराच कालापव्यय होईल अशी शक्यता दिसत होती. निर्जन अंधारातून, खडतर मार्ग शोधत केलेल्या तीन तासांच्या प्रवासाने प्रत्येकाचे अंग आंबून गेलेले होते. कंटाळा येऊ लागला होता. दिवे-आगारला पोहोचण्याकरता बाणकोटची खाडी पार केल्यावरही किमान दीड तास लागणार होता. म्हणून आणखी किती उशीर होणार या अनिश्चिततेचे सावट प्रत्येकावर पडलेले होते.



**वेशवी-बागमांडले (सुमारे १ किलोमीटर रुंदीच्या खाडीतील) फेरी-बोट-सेवेचा उपग्रह-देखावा**

मात्र, सर्व काळ सारखाच नसतो याचा प्रत्यय आम्हाला लगेचच आला. वेशवीच्या धक्क्यावर आम्ही पोहोचलो तर शांतादुर्गा ही फेरी-बोट आमच्याच प्रतीक्षेत असल्यासारखी उभी होती. मी तिकिटे काढायला खिडकीवर पोहोचलो. गाडी सरळ फेरीत चढली. बोट सुरूही झाली. मला लवकर येण्याचे भरपूर इशारे होतच होते. मीही तिकिटे हाती पडताच धावत-पळत बोटीचा फलाट चढलो. बोट सुरू झाली. तिने झपकन गिरकी घेतली, पाठी वळून, फलाट बागमांडलेच्या दिशेने वळवून ती जलदीने खाडी आक्रमू लागली. किती वेळ प्रतीक्षा करावी लागेल, या प्रश्नावर फारसा विचार करायला वेळही न मिळता, आम्ही मार्गस्थ झालो आणि फेरीतील प्रवासाचा आनंद मनात उतरवेपर्यंत, बागमांडलेच्या धक्क्यावर पावतेही झालो. दरम्यान बोटीच्या मध्यावर उभे असताना बोट स्थिर उभी आहे असे वाटे. काठावर जाताच मात्र तिच्या तीव्र वेगाची कल्पना येत होती. शिवाय, डिसेंबरातील थंडीचे झोंबरे गार वारे शरीरात हुडहुडी भरवत होते.

येथून पुढला रस्ता चालक-महाशयांना माहीत असल्याने वेळ वाचला. परंतु याही रस्त्यावर दिशादर्शक पाट्या जवळपास नाहीतच. शिवाय रात्रीची वेळ. म्हणून चालकाच्या माहितीच्या दूरच्याच रस्त्याने जावे लागले. नव्या, किनाऱ्यावरील रस्त्याचा वापर करता आला नाही. दुसऱ्या दिवशी मात्र आम्ही किनारी मार्गाचा वापर केला. तो प्रवास अतिशय सुखद असाच झाला. आता मात्र, दीड तासांच्या कंटाळवाण्या प्रवासानंतर आम्ही दिवे-आगारला पोहोचलो. त्यावेळी आनंदयात्री हॉटेलच्या श्री. भाटवडेकरांनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी आमचे हसतमुख स्वागत केले. रात्री अकरा वाजेपर्यंत आमच्याकरता थांबून आम्हाला जेवण दिले. म्हणून, आम्हाला त्या थकव्यातही आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी हरिहरेश्वर पाहायचे असल्याने, मग आम्ही लगेचच बिछान्यावर अंग झोकून दिले. सकाळी सकाळीच जाग आली तेव्हा प्रसन्न वातावरण होते. बाहेर आलो. तत्परतेने सकाळी सात वाजताच चहा मिळाला. श्री. भाटवडेकर नारळीच्या बागेतून फिरायला जाऊन परततांना दिसले. 'नास्ता कधी पाठवू' विचारू लागले. मी म्हटले 'ताबडतोब.' कारण आम्ही सगळे त्याकरता तयार होतोच. शिवाय, जेवढे लवकर निघू तेवढाच प्रवास सुखकर होतो यावर आमच्यातील सगळ्यांचाच अतुट विश्वास होता. त्यांनी गरम पाणीही सुरू झाल्याची आनंददायक वार्ता दिली. नऊ वाजेपर्यंत आम्ही सर्वतोपरी तयार झालो आणि दिवे-आगारच्या सुवर्ण-गणपतीच्या दर्शनास गेलो. पर्यटक अजूनही यायचेच होते. आम्हीच प्रथम पोहोचलो होतो. मग, सगळ्यांनी व्यवस्थित बसून अथर्वशीर्ष पठण केले. मग

हरिहरेश्वरकडे निघालो. मनात विचार आला की, सुवर्ण मुखवटा, दागिने इत्यादी संपत्ती सुरक्षित ठेवण्याकरता दिवे-आगार ही किती सुरक्षित जागा शोधलेली होती तिच्या तत्कालीन मालकाने! दुर्गम आणि अज्ञात!! त्याकाळी तर तेथवर रस्ताही नसेल बरासा!!!



हरिहरेश्वर मंदिरात कालभैरव मंदिरातूनच प्रवेश करावा लागतो. दर्शन घेतले. प्रदक्षिणा सुरू केली. हरिहरेश्वर परिक्रमेचा पहिला भाग आहे मंदिर प्रदक्षिणा, मग मंदिरापाठच्या डोंगराची वनराईने सजलेली चढण, आणि त्यानंतर आहे त्याच डोंगरावरून समुद्रकिनाऱ्यावर उतरणारा हा जिना. सुमारे दोनशे पायऱ्या म्हणजेच किमान शंभर फूट उंचीचा हा जिनाही चित्तवेधक आहे. हरिहरेश्वरची प्रकाशचित्रे दाखवतात त्यामध्ये ह्या जिन्याचीच प्रकाशचित्रे सर्वाधिक पाहायला मिळतात. मात्र त्याचेबाजूलाच असलेल्या एका नयनमनोहर शिल्पाची मात्र प्रकाशचित्रे पाहिल्याचे मला आठवत नाही. म्हणून मी मात्र आवर्जून त्याचे एक प्रकाशचित्र काढले. डाव्या बाजूला तेच दिसत आहे. प्रत्यक्षातही ते जिन्याच्या ह्याच बाजूला विराजमान आहे.

काळ्या वालुकाष्माच्या डोंगराचे समुद्राच्या बलदंड लाटांनी, सालोसाल, उत्तरोत्तर क्षरण होत होत, हरिहरेश्वरच्या परिक्रमा मार्गावरील निसर्ग-निर्मित लेण्यांची निर्मिती झाली. या खडकांमध्ये अतिशय चित्तवेधक आकार साकारलेले दिसून येतात. प्रस्तुत



निसर्गशिल्पही त्यातलेच एक आहे. मात्र, हे सारे आकार पाहण्याकरता समुद्राला ओहोटी असावी लागते. एरव्ही जिन्याच्या तळाचा सर्व भाग जलमय असल्याने परिक्रमामार्ग बंद पडतो. अशावेळी किनारा धोकादायक असतो आणि त्यात उतरणाऱ्या पर्यटकांना सावध करण्याकरता ग्रामपंचायतीने सूचना फलक लावलेला आहे. समुद्री लाटांमुळे जलजन्य खडकांच्या कायमच होत राहणाऱ्या क्षरणामुळे, ओहोटीत दृश्यमान होणाऱ्या खडकांवर, विस्मयकारक निसर्ग (निर्मित) शिल्पे साकारलेली दिसून येतात. वरील चित्रातले कोरीव खडक हे त्याचेच उदाहरण आहे. ओहोटीची (भेटीची) वेळ कशी ओळखावी याचा एक तक्ताच मला मिळाला.

अर्थातच अलिबाग आणि हरिहरेश्वर यांच्या भरती-ओहोटीच्या वेळा एकच आहेत या गृहितकावर हे आधारलेले आहे. सोयीच्या वेळा पुढील सारणीत दिलेल्या आहेत. ज्या दिवशी जायचे त्या दिवशी कोणती तिथी आहे, हे आधी कालनिर्णयमधून पाहून घ्यावे. मग सारणीनुसार

| तिथी | भेटीची वेळ |
|---|---|
| प्रतिपदा | ०४००-०६३० |
| द्वितिया | ०५००-०७०० |
| तृतिया | ०५३०-०८०० |
| चतुर्थी | ०६००-०९०० |
| पंचमी | ०७००-०९३० |
| षष्ठी | ०८००-१००० |
| सप्तमी | ०८३०-११०० |
| अष्टमी | ०९००-१२०० |
| नवमी | १०००-१२३० |
| दशमी | ११००-१३०० |
| एकादशी | ११३०-१४०० |
| द्वादशी | १२००-१५०० |
| त्रयोदशी | १३००-१६०० |
| चतुर्थी | १३००-१६०० |
| पौर्णिमा/अमा | १४३०-१७०० |

सोयीची वेळ काढून, त्यानुसार सहल ठरवावी. ही माहिती २०१०-११-१४ रोजी उपलब्ध झालेली होती. आम्ही मात्र हे सारे न पाहताच गेलेलो होतो. आमच्या पुण्याईने आम्ही गेलो त्या दिवशी, म्हणजे रविवार दिनांक १२-१२-२०१० रोजी मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी होती. सकाळी ०९.०० ते १२.०० सोयीची वेळ होती आणि आम्ही दिवे-आगारहून हरिहरेश्वरला सकाळी १०.०० च्या सुमारासच पोहोचलो होतो. आमचे भाग्यच थोर होते. एरव्ही आम्ही हरिहरेश्वरच्या अद्वितीय परिक्रमेस मुकलोच असतो.



समुद्री लाटांमुळे जलजन्य खडकांच्या कायमच होत राहणाऱ्या क्षरणामुळे, ओहोटीत दृश्यमान होणाऱ्या खडकांवर, विस्मयकारक निसर्ग (निर्मित) शिल्पे साकारलेली दिसून येतात. बाजूच्या चित्रातले विष्णूपद्म आणि उजव्या बाजूचा कोरीव खडक ही त्याचीच उदाहरणे आहेत. हरिहरेश्वरहून आम्ही दोनच्या सुमारास दिवे-आगारला परतलो. उकडीच्या मोदकांचे जेवण वाटच पाहात होते. जेवलो. पावणे तीनच्या सुमारास निघून साडे-सातच्या सुमारास डोंबिवलीस पावते झालो. एवढी समाधानकारक सहल सुफळ संपूर्ण झाल्यावर, कळले ते इतकेच की, कोकणात जाणून घेण्यासारखे खूप काही आहे. आमच्या तीन दिवसांच्या सहलीस लोक दहा दिवसांची सहल का म्हणत आहेत, तेही समजले. मला मात्र तीच सहल महिन्याची करावी अशी इच्छा होऊ लागली. सहप्रवाशांची इच्छाही काही निराळी नव्हती. मात्र, दैनंदिन जीवनात उत्साह, हुरूप, आणि आनंद भरण्याचे काम आमच्या याही सहलीने यथासांग पार पाडलेलेच होते. परशुरामाची ही कोकणभूमी बारकाईने अनुभवावी, ह्याकरता ईश्वर आम्हाला पुन्हा संधी देवो हीच प्रार्थना!

**संदर्भ:**


१. शिवथरघळ http://trekshitiz.com/marathi/Shivtharghal-Trek-S--lpha.html
२. समर्थांचे फारसे माहीत नसलेले साहित्य http://samartharamdas1.blogspot.com/2010š06š20šarchive.html
३. श्री क्षेत्र परशुराम http://www.parshuramdevasthan.org/
४. चिपळूण नगरपरिषद http://npchiplun.org/EIPPROD/citymain.jsp
५. सुवर्णदुर्ग शिपिंग कंपनी http://carferry.in/dabhol-dhopave/
६. महर्षी धोंडो केशव कर्वे https://sndt.ac.in/
७. ही अंतरे, हरिहरेश्वरला दुसरे दिवशी आम्ही विकत घेतलेल्या 'साद सागराची-श्रीवर्धन-हरिहरेश्वर-दिवे-आगार' ह्या पुस्तकातून घेतलेली आहेत. श्री. पराग पिंपळे यांनी लिहिलेले हे पुस्तक खूपच माहितीपूर्ण वाटले. कोकणसहलीचे कोणतेही नियोजन करण्यापूर्वी यावर नजर टाकल्यास अर्थपूर्ण मार्ग सापडतील असे वाटते. सप्टेंबर २००६ मध्ये प्रथम प्रकाशित झालेल्या पुस्तिकेची ही ऑगस्ट-२०१० मधली २३-वी आवृत्ती होती. किंमत रु.५०/-फक्त. बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे ने प्रकाशित केलेल्या एकूण सहा पुस्तिकांच्या संचातील हे एक पुस्तक आहे.



**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# ओळख वनस्पतींची
# रंगोत्सव

*'रंगोत्सव' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

बेहडा किंवा हेला हा वृक्ष सह्याद्री व पश्चिम किनाऱ्यावर सर्वत्र आढळतो. एक औषधी गुणधर्म असणारा वृक्ष. तसे औषधी गुणधर्म प्रत्येक झाडामध्येच असतात. महामुनी चरक यांनी आपल्या शिष्यांना जंगलात जाऊन औषधी गुणधर्म नसणारे झाड किंवा वनस्पती शोधून आणण्यास सांगितले. सारे शिष्य वन-वन फिरले, परंतु त्यांना औषधी गुणधर्म नसणारे एकही झाड किंवा वनस्पती आढळली नाही अशी कथा आहे. तात्पर्य; एवढेच की प्रत्येक वनस्पतीमध्ये औषधी गुण आहेतच. गरज आहे त्यावर अधिक संशोधन होण्याची व त्याचे पेटंट मिळविण्याची. भारतीयांना आयुर्वेदाची फार मोठी परंपरा लाभली आहे. जर आपण ग्रामीण भागात गेलो तर लहान लहान मुलं देखील त्या परिसरातील झाडांची नावे पटापट सांगतात. तसेच वडिलधारी माणसे त्यांचे औषधी गुणधर्मही सांगतात. आरोग्य रक्षणासाठी विविध वनस्पतींचा वापर करणे हा त्यांच्या जीवनाचा एक भाग आहे. बेहड्याच्या झाडाचे देखील त्यांच्या दृष्टीने वेगळे महत्त्व आहे. एक उत्तम पशू खाद्य म्हणूनही बेहड्याच्या पानांचा वापर ग्रामीण भागात होतो. त्रिफळा चूर्णातील आवळा, हिरडा व बेहडा या तीन घटकांतील हा महत्त्वाचा घटक. हिरव्यागार पानांचा एक भव्य अन् डौलदार वृक्ष म्हणूनही याची ख्याती आहे. परंतु मला आवडला हा याच्या रंगीत पानांसाठी.





शिशिरात पानगळ झाल्यानंतर मार्च-एप्रिलमध्ये या झाडावर बारीक लाल गुलाबी रंगाचे कोंब फुटतात. अन् हळूहळू प्रत्येक फांदीच्या टोकाशी लाल पोपटी रंगाचे झुपके आकार घेऊ लागतात. या लाल पोपटी रंगावर जेव्हा सकाळची कोवळी उन्हं विसावतात त्यावेळची शोभा केवळ अवर्णनीय असते. त्या काळात एरवीही दिवसभर हे झाड सुंदरच दिसते. पण सकाळ संध्याकाळची तिरपी किरणं याची शोभा द्विगुणीत करतात. लांबून बरेचदा कुसुम असावा म्हणून फसगत होऊ शकते. पण याचे वैशिष्ट्य म्हणजे फांदीच्या टोकांशी होणारी पानांची गर्दी व गोलाकार झुपके. कुसुमाची पानं संयुक्तिक व एका पाठोपाट एक येणाऱ्या दोन दोन पानांच्या जोड्या अशी. त्यामुळे कुसुमाचे संपूर्ण पान लांबोळके दिसते. तर बेहड्याची पाने रंगीत पुष्पगुच्छा सारखी फुगीर गोलाकार व शेवटी टोकदार असणारी. बेहड्याची पाने काहीशी वडाच्या किंवा जंगली बदामाच्या पानासारखी दिसतात. त्यामुळे लांबूनही बेहड्याचे झाड सहज ओळखता येईल.

हा वृक्ष भारतभर सर्वत्र मिश्र मोसमी पानझडीच्या जंगलात आढळतो. २० ते १५ मीटर उंचीपर्यंत वाढणारा हा वृक्ष विविध उद्यानांत तसेच रस्त्याच्या बाजूस देखील

(पृष्ठ क्र.२२ वर)

वक्तृत्व कला म्हणजे आत्म्याला पडणारी जादूची भुरळ. - प्लेटो

# लॉर्ड लिटन : ब्रिटिशकालीन भारताचे वादग्रस्त गव्हर्नर-जनरल

**(भाग : १)**

*ब्रिटिशकालीन भारताचे गव्हर्नर-जनरल लॉर्ड लिटन यांच्या वादग्रस्त कारकिर्दीचा आढावा घेणारा लेख - संपादक*

ब्रिटिशांनी भारतावर १७५७ ते १९४७ या कालावधीत राज्य केले. या कालावधीत त्यांनी भारतावर विविध प्रांतांचे गव्हर्नर्स व भारताचा गव्हर्नर-जनरल यांच्या सहाय्याने आपले प्रशासकीय व राजकीय प्रभुत्व ठेवले. गव्हर्नर हा ब्रिटिश काळात प्रांत पातळीवरील सर्वात महत्त्वाचा प्रशासक असे व तो प्रांताच्या कारभारासाठी जबाबदार असे. काही प्रांतांचा कारभार पाहण्यासाठी ब्रिटिशांनी लेफ्टनंट गव्हर्नर्सची नियुक्ती केली होती. संपूर्ण भारताचे प्रशासन व कारभार गव्हर्नर-जनरलच्या आधिपत्याखाली चालत असे. एका अर्थाने सर्व गव्हर्नर्स व लेफ्टनंट गव्हर्नर्स हे गव्हर्नर-जनरलच्या नियंत्रणाखाली काम करत असत.

१८५७ च्या उठावानंतर भारतातील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात आली व भारत खऱ्या अर्थाने ब्रिटन सरकारच्या (ब्रिटनचे राजे-राणी व पंतप्रधान तसेच मंत्रीमंडळ) नियंत्रणाखाली गेला. इंग्लंडच्या राणीच्या १८५८च्या जाहीरनाम्यानंतर भारताच्या गव्हर्नर-जनरलला 'व्हाईसरॉय' असे देखील संबोधण्यात येऊ लागले. यानुसार लॉर्ड कॅनिंग हा भारताचा ब्रिटिश काळातील पहिला व्हाईसरॉय बनला. आपण या लेखात प्रामुख्याने लॉर्ड लिटन या गव्हर्नर-जनरलच्या वा व्हाईसरॉयच्या कारकीर्दीतील प्रमुख घटनांचा आढावा घेणार आहोत.

लॉर्ड लिटन यांचे पूर्ण नाव एडवर्ड रॉबर्ट बुलवर, फर्स्ट अर्ल ऑफ लिटन (Edward Robert Bulwer, First Earle of Lytton) असे होते. त्यांचा जन्म ८ नोव्हेंबर १८३१ साली लंडनमध्ये झाला होता. लिटन यांच्यापूर्वी लॉर्ड नॉर्थब्रूक (Lord Northbrook) हे भारताचे गव्हर्नर-जनरल होते. लॉर्ड लिटन यांच्या वडिलांचे नाव एडवर्ड जॉर्ज अर्ल लिटन बुलवर लिटन (Edward George Earle Lytton Bulwer Lytton) असे होते, तर त्यांच्या आईचे नाव रोजीना ॲन डॉयल बुलवर लिटन (Rosina Anne Doyle Bulwer Lytton) असे होते. त्यांचे शिक्षण लंडनमधील हॅरो बोर्डिंग शाळेत तसेच बॉन विद्यापीठात (जर्मनीत) झाले होते. लिटन यांनी आधुनिक भाषांचे अध्ययन केले होते. त्यांना कविता लिहिण्याची आवड होती. ते चांगल्या कविता करत असत. त्यांच्या कवितांचा पहिला खंड १८५५ साली क्लिटेमनेस्ट्रा, द अर्ल्स रिटर्न अँड आदर पोएम्स् (Clytemnestra, The Earl's Return and other Poems) या शीर्षकाने प्रसिद्ध झाला होता. त्यांनी या कविता १८४९ सालीच लिहिलेल्या होत्या. परंतु अगोदर नमूद केल्याप्रमाणे त्या १८५५ साली प्रसिद्ध झाल्या. १८५७ साली त्यांचा अजून एक कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. या कवितासंग्रहाचे शीर्षक द वंडरर-The Wanderer असे होते. त्यांची काव्यमय भाषाशैली, वर्णनातील स्पष्टपणा व कवितेत व्यक्त झालेल्या कल्पना यामुळे हे कवितासंग्रह वाचकांमध्ये प्रसिद्ध वा बऱ्यापैकी लोकप्रिय ठरले. लिटन यांच्या या काव्यलेखनामुळे वा काव्याच्या आवडीमुळे त्यांचे चार्ल्स डिकन्स (Charles Dickens) व जॉन फोर्स्टर (John Forster) यांच्यासोबत घनिष्ठ संबंध निर्माण झाले.

भारतात गव्हर्नर-जनरल वा व्हाईसरॉय म्हणून नेमणूक होण्यापूर्वी लिटन यांनी ब्रिटनच्या परराष्ट्र सेवेत सेवा केली होती. १८४९ साली लॉर्ड लिटन यांची ब्रिटनचे अमेरिकेतील तत्कालीन राजदूत व लिटन यांचे काका विल्यम हेन्री लिटन अर्ल बुलवर, बॅरन डॅलिंग – (William Henry Lytton Earle Bulwer, Baron Dalling) यांचे खाजगी सचिव म्हणनू वॉशिग्टंन येथे नेमणूक करण्यात आली होती. लिटन यांनी ब्रिटनच्या परराष्ट्र खात्यासाठी फ्लॉरेन्स-इटली, हेग-नेदरलँडस् तसेच व्हिएन्ना- ऑस्ट्रिया येथे देखील सेवा केली होती. व्हिएन्ना मधून त्यांची नियुक्ती पूर्व युरोपातील बेलग्रेड येथे झाली. लिटन यांची ब्रिटनच्या परराष्ट्र खात्यातर्फे कोपेनहॅगन-डेन्मार्क, अॅथेन्स-ग्रीस, लिस्बन-पोर्तुगाल युरोपमधील अशा विविध ठिकाणी नियुक्ती झालेली होती. आपण अगोदर पाहिलेलेच आहे की, लिटन हे चार्ल्स डिकन्स व जॉन फोर्स्टर अशा दिग्गज साहित्यिकांच्या संपर्कात आले होते व त्यांनी स्वतः काही कवितासुद्धा लिहिलेल्या होत्या. १८६० साली लिटन यांनी 'ल्युसाईल' (Lucile) नामक कादंबरी लिहून साहित्य जगतात अजून मोठ्या प्रमाणात नाव कमावले. अशा या लॉर्ड लिटन साहेबांची ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान बेजांमिन डिझराईली (फर्स्ट अर्ल ऑफ बिकन्सफिल्ड) यांनी १८७६ च्या जानेवारी महिन्यात भारताचे गव्हर्नर जनरल-व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती केली. यापूर्वी लिटन यांना मद्रास इलाख्याचे गव्हर्नर पद देऊ करण्यात आले होते. परंतु त्यांनी तेव्हा ते नाकारले होते. मात्र भारताचे गव्हर्नर जनरल पद ते नाकारू शकले नाहीत. बेजांमिन डिझराईली यांच्याबाबत थोडक्यात सांगावयाचे तर त्यांचा जन्म २१ डिसेंबर १८०४ रोजी लंडनमधील किंग्ज् रोड, बेडफोर्ड रोड येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आयझॅक तर आईचे नाव मारीया असे होते. बेजांमीन डिझराईली हे जन्माने 'ज्यू' धर्मीय होते. परंतु ३१ जुलै १८७८ रोजी म्हणजेच वयाच्या १२ व्या ते १३ व्या वर्षी त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. डिझराईली हे ब्रिटनमधील हुजूर पक्षाचे नेते होते. या हुजूर पक्षाची स्थापना १८३४ मध्ये झाली होती. त्यापूर्वी हा 'टोरी' म्हणजेच इंग्रजीत - Tory Party या नावाने ओळखला जाई. बेंजामीन डिझराईली हे २७ फेब्रुवारी १८६८ ते १ डिसेंबर १८६८ तसेच २० फेब्रुवारी १८७४ ते २१ एप्रिल १८८० या कालावधीत ब्रिटनचे दोनवेळा पंतप्रधान होते. डिझराईली हे स्वतः कादंबरीकार होते व पंतप्रधान असतानादेखील कथा-कादंबऱ्या लिहित असत. असो.

आपण येथे चार्ल्स डिकन्स यांचा उल्लेख केला आहे. त्यामुळे त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती देणे सयुक्तिक ठरेल. चार्ल्स डिकन्स हे १९ व्या शतकातील इंग्लंडमधील ख्यातनाम कादंबरीकार होते. त्यांचा जन्म नैऋत्य इंग्लंडमधील पोर्टस्माऊथ (Portsmouth) जिल्ह्यातील पोर्टसी (Portsea) येथे ७ फेब्रुवारी १८१२ रोजी झाला. येथील १३ माईल एंड टेरास (13 Mile End Terrace) हे घर म्हणजे त्यांचे जन्मस्थळ होय. १९०३ पासून या घराचे रूपांतर वस्तुसंग्रहालयात करण्यात आले असून त्यास इंग्रजीमध्ये डिकन्स बर्थप्लेस म्युझियम - Dickens Birthplace Museum असे म्हटले जाते. चार्ल्स डिकन्स यांच्या वडिलांचे नाव जॉन तर आईचे नाव एलिझाबेथ असे होते. जॉन डिकन्स हे ब्रिटनच्या आरमारात सहाय्यक कारकून होते व त्यांची नेमणूक पोर्टस्माऊथ येथे झालेली होती. चार्ल्स डिकन्स हे त्यांच्या आईवडिलांचे दुसरे अपत्य होते. त्यांना एक मोठी बहीण होती. तिचे नाव फ्रांसीस एलिझाबेथ डिकन्स (Frances Elizabeth Dickens) असे होते. तिचा जन्म १८१० साली झाला होता. तिला संगीताची आवड होती. चार्ल्स डिकन्स यांच्या इतर भावंडांची नावे पुढीलप्रमाणे होती - आल्फ्रेड अॅलन डिकन्स, लेटिशिया मेरी डिकन्स, हॅरियट डिकन्स, फ्रेडरीक डिकन्स, आल्फ्रेड लॅम्बर्ट डिकन्स, ऑगस्टस्

घुबड एकटे राहते म्हणून कोणी त्याला शहाणे समजत नाही. - टी. फुलर

डिकन्स. चार्ल्स डिकन्स यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या १९ व्या शतकात खूप गाजल्या व आजही जगभरात त्या वाचल्या जातात. त्यांच्या काही कादंबऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – द पिकविक् पेपर्स (The Pickwick Papers ), ऑलीव्हर व्टिस्ट (Oliver Twist), निकोलस निकलबाय (Nicholas Nickleby), द ओल्ड क्युरॅसिटी शॉप (The Old Curiosity Shop), डॉंबे अँड सन (Dombey and Son), डेव्हिड कॉपरफिल्ड (David Copperfield), ब्लीक हाऊस (Bleak House), अ टेल ऑफ टू सिटीज् (A Tale of Two Cities), ग्रेट एक्सपेक्टेशन्स् (Great Expectations). येथे एक बाब निदर्शनास आणून द्यावीसी वाटते व ती अशी की, चार्ल्स डिकन्स यांच्या डेव्हिड कॉपरफिल्ड या कादंबरीवर 'बीबीसी'नें (BBC-British Broad Casting Corporation) १९९९ साली दोन भागांची नाट्य-मालिका बनविली होती. तसेच त्यांची 'अ टेल ऑफ टू सिटीज्' ही कादंबरी १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीवर आधारित होती. असो.

आपण येथे जॉन फोर्स्टर (John Forster) यांचा उल्लेख केला. त्यामुळे त्यांच्या विषयीदेखील थोडक्यात माहिती घेणे योग्य ठरेल. जॉन फोर्स्टर यांचा जन्म २ एप्रिल १८१२ रोजी ईशान्य इंग्लंडमधील नॉर्थम्बरलँड – Northumberland काऊंटीमधील न्युकासल अपॉन टाईन – Newcastle upon Tyne या शहरात झाला. हे शहर टाईन – Tyne नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले असून 'नॉर्थ सी' पासून (North Sea) म्हणजेच ब्रिटनच्या पूर्व किनाऱ्यावरील उत्तर समुद्रापासून साधारणतः आठ मैल म्हणजेच तेरा किलोमीटर एवढ्या अंतरावर आहे. त्यांच्या वडिलांचे नाव रॉबर्ट तर आईचे नाव मेरी असे होते. १८२८ साली त्यांच्या चार्ल्स ॲट टनब्रीज (Charles at Tunbridge) या नाटकाचे 'न्यू कासल' येथे प्रयोग झाले. त्यांनी विविध पत्रांमध्ये साहित्य-समीक्षा लिहिलेली होती. जॉन फोर्स्टर यांची ओळख चार्ल्स डिकन्स यांचे घनिष्ठ मित्र व सल्लागार अशीदेखील होती. त्यांच्या इतर काही साहित्यकृतींची नावे पुढील प्रमाणे आहेत – 'द ॲरेस्ट ऑफ द फाईव मेंबर्स बाय चार्ल्स वन' (The Arrest of the Five Members by Charles-I), 'सर जॉन इलियट : अ बायोग्राफी' (Sir John Elliot : A Biography) , 'द लाईफ ऑफ चार्ल्स डिकन्स' (The Life of Charles Dickens), 'द लाईफ ऑफ जोनाथन स्विफ्ट' (The Life of Jonathan Swift), इत्यादी. ते काही काळ जगप्रसिद्ध अशा केंब्रीज विद्यापीठात होते. परंतु नंतर ते लंडनला आहे व तेथील युनिव्हर्सिटी कॉलेजमधून (University College) विधी वा कायद्याचे शिक्षण घेतले. अशा या १९ व्या शतकातील इंग्लंडमधील दोन प्रसिद्ध साहित्यिकांचा प्रभाव लॉर्ड लिटन यांच्यावर होता. असो.

लॉर्ड लिटन यांची भारतातील गव्हर्नर-जनरल पदाची कारकीर्द फारच वादळी ठरली. लॉर्ड लिटन यांचा उल्लेख भारतीयांचे नावडते गव्हर्नर-जनरल असा केल्यास अतिशयोक्ती ठरू नये. लिटन साहेबांनी १२ एप्रिल १८७६ या दिवशी भारताच्या गव्हर्नर-जनरल या पदाचा पदभार स्वीकारला वा सूत्रे हाती घेतली. लिटन यांच्या काळात दुसरे आंग्ल-अफगाण युद्ध झाले. या युद्धाची प्रमुख कारणे रशियाचा मध्य आशियातील हस्तक्षेप, तसेच अफगाणिस्तानातील वाढणारा प्रभाव हे होते. त्याचप्रमाणे लॉर्ड लिटन व इतर तत्सम ब्रिटिश प्रभुतींना भारताच्या सीमा अफगाणिस्तानापर्यंत रुदांवून अफगाणिस्तान कायमस्वरूपी भारताशी जोडावयाचा होता यात वाद नाही. लिटन साहेबांना तर भारतीय रेल्वे दक्षिण अफगाणिस्तानातील कंदाहार प्रांतापर्यंत न्यावयाची होती. लिटनने अफगाणिस्तानचा तत्कालीन आमीर, शेर अली याच्या दरबारात भारतातून ब्रिटिशांचा एक दूत पाठविला. परंतु या ब्रिटिश दुताला अफगाणिस्तानात

प्रवेश नाकारण्यात आल्याने लिटनला राग आला व त्याने अफगाणिस्तानला धडा शिकविण्याचा निर्णय घेतला. त्याने या घटनेनंतर अफगाणिस्तानची संभावना 'an earthen pipkin between two metal pots' अशी केली. या इंग्रजी वाक्याचे मराठीमध्ये साधारणतः 'दोन धातूंच्या भांड्यांमधील मातीचे भांडे' असे भाषांतर होईल. लिटनला येथे अभिप्रेत असलेली धातूची दोन मजबूत भांडी म्हणजे रशिया व ब्रिटिश भारत ही होती; तर या दोन बलाढ्य देशांमधील नव्हे, धातूंच्या भांड्यांमधील कमकुवत देश म्हणजेच 'मातीचे भांडे', अफगाणिस्तान होते; असा याचा अर्थ निघतो. १८७८ साली लिटनने भारतातील ब्रिटिश फौजांना बोलाव व खैबर खिंड ओलांडून अफगाणिस्तानवर हल्ला करण्याचा आदेश दिला व त्यानुसार ब्रिटिश फौजा दक्षिण अफगाणिस्तानात घुसल्या व त्यांना सुरुवातीच्या काळात अफगाणिस्तान विरोधात यश देखील मिळाले. शेर अलीला काबुलला पळून जावे लागले व तो हद्दपारीत असतानाच त्याचा एक वर्षाच्या कालावधीत मृत्यू झाला. शेर अलीच्या जागी ब्रिटिशांनी याकुब या नावाच्या व्यक्तीची आमीर म्हणून नियुक्ती केली. तो ब्रिटिशांशी एकनिष्ठ असलेला त्यांचाच हस्तक होता. मेजर लुईस कॅव्हॅगनरी – Major Louis Cavagnari या ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्याने अफगाणिस्तानात ब्रिटिशांचा कायमस्वरुपी दूत ठेवण्याची देखील व्यवस्था केली. मेजर लुईस कॅव्हॅगनरी अफगाणिस्तानातून लिटन साहेबांना 'तेथे सगळे काही सुरळीत चालले असून अफगाणिस्तानातील परिस्थिती अतिशय शांततामय आहे' अशा स्वरूपाचे संदेश पाठवित असे. मात्र, कॅव्हॅगनरीला अफगाणिस्तानातील ही शांतता म्हणजे वादळापूर्वीची शांतता होय हे ओळखता आले नाही. त्याने २ सप्टेंबर १८७९ रोजी अफगाणिस्तानातून लिटनला 'All Well' असा संदेश धाडला व दुसऱ्याच दिवशी अफगाण जनतेने कॅव्हॅगनरीसहीत तेथील सर्व ब्रिटिशांचा खातमा केला. लिटनने याला प्रत्युत्तर म्हणून अफगाणिस्तानात अजून जास्त प्रमाणात सैन्य धाडले व पुन्हा एकदा अफगाण व ब्रिटिश सेनेत रणकंदन माजले. परंतु यावेळी अफगाणांनी वा पठाणांनी ब्रिटिश सैन्याला मोठा प्रतिकार केला त्यामुळे ब्रिटिश सैन्य अतिशय संथ गतीने पुढे सरकत होते. या युद्धात दोन्ही बाजूंकडून क्रूरपणाचे दर्शन घडत होते. या युद्धावर ब्रिटिशांना अमाप खर्च करावा लागला. अर्थात, हा खर्च भारताच्या खजिन्यातून म्हणजेच भारतीयांनी कर रुपाने दिलेल्या पैशांतून होत होता. त्यामुळे हे दुसरे आंग्ल-अफगाण युद्ध भारतीयांमध्ये फारच अप्रिय ठरले. १८८० च्या फेब्रुवारी महिन्यात मांडलेल्या भारताच्या अर्थसंकल्पात लॉर्ड लिटनने ४,००,००० पौंड (इंग्लंडचे चलन) शिलकीचा अर्थसंकल्प मांडला; पण हे लष्कराच्या विशिष्ट पद्धतीने लेखा वा जमाखर्च मांडण्याच्या पद्धतीमुळे शक्य झाले. वस्तुतः नंतर असे निदर्शनास आले की, त्यावेळी अर्थसंकल्पात ४ दशलक्ष पौंड एवढी तूट होती. लिटनचा अंदाज असा होता की, हे दुसरे आंग्ल-अफगाण युद्ध लढण्यासाठी एकंदरीत ५,७५,००० पौंड एवढा खर्च झाला. परंतु इतर तज्ज्ञांच्या मते या युद्धाचा खर्च १७,४९०,००० पौंड एवढा होता. त्यातच लिटनने अफगाण सीमेनजीक लोहमार्ग बांधण्यासाठी ५ दशलक्ष पौंड एवढी रक्कम खर्च केली होती. या सर्व गोष्टींमुळे १८८० च्या मार्च महिन्यात ब्रिटनमध्ये झालेल्या संसदीय निवडणूकांमध्ये डिझराईलीच्या हुजूर पक्षाचा ग्लॅडस्टनच्या (Gladstone) लिबरल (Liberal) पक्षाने दारूण पराभव केला. डिझराईलीच्या हुजूर पक्षाच्या या पराभवानंतर त्याने आपल्या पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला व तेव्हाच लिटननेसुद्धा आपल्या भारताच्या गव्हर्नर-जनरल पदाचा राजीनामा दिला. अशाप्रकारे डिझराईली तसेच लिटनचा राजीनामा एकाचवेळी ब्रिटनच्या सम्राज्ञीला सुपूर्त करण्यात

आला. यानंतर इंग्लंडमध्ये सत्तेवर आलेल्या ग्लॅडस्टन यांच्या नेतृत्वाखालील सरकारने लॉर्ड रिपन यांची भारताचे गव्हर्नर-जनरल म्हणून नियुक्ती केली. लॉर्ड लिटन यांच्या अफगाणिस्तानविषयक या आक्रमक नीतीचा उल्लेख इंग्रजीत 'Forward Policy' असा केला जातो.

आपण अगोदर उल्लेख केलेलाच आहे की, लॉर्ड लिटन यांची भारताच्या गव्हर्नर-जनरल पदाची कारकीर्द वादळी ठरली. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी आपल्या गव्हर्नर-जनरल पदाच्या कारकिर्दीत भारताबाबत अनेक वादग्रस्त निर्णय घेतले. अर्थात, त्यांचे अनेक निर्णय भारतात अप्रिय ठरले व लॉर्ड लिटन भारताचा वापर फक्त इंग्लंडच्या भल्यासाठीच करण्याच्या एकमेव उद्देशाने आलेत की काय, अशा प्रकारची भावना भारतीयांमध्ये निर्माण झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. लॉर्ड लिटन यांच्या भारतविषयक अनेक निर्णयांपैकी एक म्हणजे त्यांनी ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या विविध वस्तूंवरील कर काढून टाकण्याचा घेतलेला निर्णय होय. १८५० नंतर भारतामध्येदेखील व प्रामुख्याने मुंबई शहरात कापड गिरण्या सुरू व्हायला लागल्या. यात अनेक भारतीय उद्योजक व गुंतवणूकदार आघाडीवर होते. उदाहरणच द्यायचे तर, १८५३ साली कोवासजी नानाभॉय यांनी मुंबईतील पहिली कापड गिरणी (कापसाच्या सूतापासून कापड बनविणारी) सुरू केली. यामुळे इंग्लंडमधील लँकशायरमधील (Lancashire) ब्रिटिश सूत गिरणी मालकांना याचा हेवा व मत्सर वाटू लागला. त्यामुळे त्यांनी त्यांचे सूती कापड भारतात स्वस्त दराने वा कमी किंमतीत विकता यावे याकरिता त्यांच्या कापडावर भारतात लावला जाणारा आयात कर (Import Duty) रद्द करण्यात यावा असा तगादा लावला होता. त्यावेळी इंग्लंडमध्ये सत्तेत असलेल्या हुजूर पक्षाच्या सरकारला या गिरणी मालकांना दुखवायचे नव्हते म्हणून त्या सरकारने ११ जुलै १८७७ रोजी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये-House of Cammons (ब्रिटनच्या संसदेचे कनिष्ठ दालन) याबाबतचा प्रस्ताव आणला. इंग्लंडच्या मंत्रीमंडळातील तत्कालीन भारतमंत्री लॉर्ड सॅलीसबरी (Lord Salisbury) यांनी हा प्रस्ताव तात्काळ लिटन यांच्या आधिपत्याखालील भारत सरकारकडे पाठविला. लॉर्ड लिटन यांनीदेखील भारतातील दुष्काळामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला असताना देखील या प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही केली व इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या जवळ जवळ एकोणतीस वस्तुंवरील आयात कर रद्द केला. यात साखर व विविध प्रकारच्या कापडांचा समावेश होता. लिटन यांच्या या निर्णयामुळे ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या या वस्तू स्वस्त होणार होत्या व त्याचा फटका भारतात भारतीय कलावंतांनी बनविलेल्या विविध वस्तूंच्या बाजारपेठेस वा विक्रीला बसणार होता. याचे कारण, लिटन यांनी आयात कर रद्द केल्यामुळे ब्रिटनमधील वस्तू भारतीय बाजारपेठेत भारतीय वस्तुंपेक्षा स्वस्तदरात वा कमी किंमतीत उपलब्ध होणे शक्य होणार होते. किंबहुना, तसे झाले देखील यामुळे विविध वस्तूंचे उत्पादन करणारे भारतीय कलावंत बेकार झाले व त्यांना आपली उपजीविका कमावणे देखील कठीण होऊन बसले. वाचकांनी ब्रिटिश राजवटीचा एकंदरीतच भारतीय अर्थव्यवस्थेवर कसा विपरीत परिणाम झाला हे विस्तृतपणे जाणून घेण्यासाठी सुमीत सरकार लिखित 'मॉडर्न इंडिया' व एस्. सी. रेचौधरी लिखित 'हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया : अ डिटेल्ड स्टडी ऑफ पोलीटिकल, इकॉनॉमिक, सोशियल अँड कल्चरल आसपेक्टस्' ही पुस्तके वाचावीत. अर्थात, याविषयावर इतर अनेक लेखकांनी देखील लिखाण केले आहे. परंतु येथे नमूद केलेली वरील दोन पुस्तकेदेखील अप्रतिम आहेत. असो. १८७९ साली लिटन यांनी हलक्या कापडावरील आयात

(पृष्ठ क्र.२५ वर)

# बघू या थोडं

*शेअर बाजार, म्युच्युअल फंड इ. गुंतवणुकीच्या साधनांवर प्रकाश टाकणारा श्री. चन्द्रशेखर टिळक यांचा लेख- संपादक*

आज (२२ मार्च २०१९) दिवसभराची उलाढाल बंद होताना तीस समभागांच्या बाजारभावावर आधारीत मुम्बई शेअरबाजाराचा निर्देशांक (सेन्सेक्स म्हणजेच बीएसई सेन्सिटिव इंडेक्स) ३८१६४ अंशांवर बंद झाला आहे. दिवसा अखेर आधीच्या दिवसांच्या तुलनेत २२२ अंशांनी तो खाली आला आहे. यात चिंता करण्याचे फारसे कारण नाही. कारण गेल्या काही दिवसांतल्या जागतिक व स्थानिक पातळीवरील आर्थिक – राजकीय – सामाजिक घटना लक्षात घेता ते तसे सुसंगतच आहे. मुळातच दिवसांत २२२ अंशांच्या बदलाची आपल्या सगळ्यांनाच आता पुरेपूर सवय झाली आहे.

पण सध्या सुरू असलेले आर्थिक वर्ष आता काही दिवसांतच संपेल. (चालू आर्थिक वर्ष मुद्दामहून म्हटलं नाही. कारण आपल्या मराठीत 'चालू' शब्दाला अनेक अर्थ आहेत. असो.) त्यामुळे एकंदरीतच स्वतःच्या गुंतवणुकीचा ....पोर्टफोलिओचा विचार करणे उपयोगाचे ठरेल.

तसेही या आर्थिक वर्षासाठीचे आयकर विवरण – पत्र (इन्कम – टॅक्स रिटर्न्स) भरण्यासाठी आवश्यक म्हणून वर्षभरात मिळालेले बँक ठेवीवरील व्याज, म्युच्युल फंड योजनांमधला लाभांश, शेअर्समधील गुंतवणुकीवर मिळालेला लाभांश अशांची एक यादी तयार करावीच लागेल. ती यादी केवळ इन्कमटॅक्स रिटर्न्सची गरज म्हणून न करता आपल्या आजपर्यंतच्या गुंतवणुकीचे आणि त्यापासून मिळालेल्या उत्पन्नाचे योग्य मूल्यमापन म्हणून त्याकडे पाहिले तर .....

कारण एकंदरीतच आपले स्वतःचे वैयक्तिक वार्षिक उत्पन्न व त्याचे स्वरूप, त्यातून आपण केलेली गुंतवणूक आणि त्यांपासूनचे उत्पन्न (लाभांश व भांडवल – वृद्धी ....डिव्हीडंड व कॅपिटल अप्रेसिॲशन ...अशा दोन्ही अर्थाने) यांचा विचारपूर्वक व तपशील – आधारीत अभ्यास करण्याची ही योग्य संधी ठरेल.

ठरतेच.

तसं पाहाण्याची विनंती करण्यासाठीच हा लेख.

असा विचार करत असताना आजमितीस असं सुचवावेसे वाटते की .....

१ . अनेकजण त्यांना वर्षभरात मिळणार असणारा LTA तसेच शक्य असेल तर Leave Encashment याचे पैसे आर्थिक वर्षाच्या खरं म्हणजे शेवटच्या महिन्यात, फार फार तर शेवटच्या दोन महिन्यांत घेतात. ज्याची त्याची सवय हा जितका त्यात भाग असतो तितकाच भाग शेवटच्या काही महिन्यांच्या पगारातून कापल्या जाणाऱ्या आयकराचे प्रमाण जास्त असल्याने त्यावेळी अशी रक्कम हाती येणे संसार चालवण्यात सोयीचे जाते हाही आहे आणि असतो. त्यावरही टॅक्स कापूनच तो हातात येत असतो ही गोष्ट वेगळी !

त्यातून आयकर वाचवण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक व एरवीचीही गुंतवणूक अनेकदा अनेकजण करतात.

ते गुंतवणूक करतात हे चांगलेच आहे.

---

वाङ्मय हे कुबडी म्हणून फारच वाईट; छडी म्हणून मात्र फार चांगले. – सी. लॅम्ब

फक्त ही वेळ आणि पद्धत चुकीची आहे.

LTA किंवा Leave Encashment यापोटी मिळणारी रक्कम वर्षभरात कधीही घेतली तरी एकच असते.

त्यावर द्याव्या लागणाऱ्या आयकराचा दरही आर्थिक वर्षभर एकच असतो.

मग हे करायला आर्थिक वर्ष संपत येण्याची वाट का पाहायची ? ते आर्थिक वर्षाच्या सुरवातीलाच केले तर ! गुंतवणूक हे काळ - काम - वेगाचे गणित आहे. जितक्या लवकर सुरू होईल तितके जास्त चांगले.

२. याच मार्गातून असं नव्हे, तर एकंदरीतच सध्या हातात असलेली गुंतवणूक - योग्य रक्कम सर्वसामान्य भारतीय गुंतवणूकदारांनी गुंतवताना घाई न केलेलीच बरी ! विशेषतः शेअरबाजाराशी निगडित किंवा त्यावर आधारीत अशी गुंतवणूक करताना तरं हे जास्तच खरे आहे. आपल्या लोकसभेच्या निवडणुका पार पडेपर्यंत असे सबुरीचे धोरण बाळगणे उपयोगाचे ठरेल.

आजमितीला तरी मोदी सरकार पुन्हा सत्तारूढ होईल अशीच अटकळ बाजार गृहीत धरून वागत आहे असा अनेकांचा निष्कर्ष आहे. जसजसे निवडणुकांचे वातावरण तापू लागेल तसतसे बाजार अनेक चढ - उतार दाखवणे अपरिहार्य आहे. लोकसभा निवडणुकांच्या मतदानाच्या सर्व फेऱ्या पूर्ण होईपर्यत हे वातावरण असेच राहिल असाच गेल्या काही निवडणुकांचा अनुभव सांगतो.

त्यानंतर मतमोजणीच्या दिवसापर्यंत बाजार खालच्या पातळीवर असेल असाही आधीच्या काही निवडणुकांचा अनुभव आहे.

मतमोजणीचा कल जसजसा स्पष्ट होत जाईल तसतसा बाजाराचा रोख दृढ होत जातो असाही अनुभव आहे. विशेषतः नवीन सरकारच्या शपथविधीनंतर पहिले सहा महिने बाजार साधारणपणे चढा असतो असा अनुभव आहे.

अर्थातच १९९६ साल याला अपवाद आहे. त्यावेळी बाजार खाली गेला. कारण त्या एका वर्षात आपल्या देशाने तीन पंतप्रधान पाहीले... असं सारखं सारखं होत नाही हे नक्कीच !

याचा फायदा आपण आपली गुंतवणूक करताना नक्कीच करून घ्यायला हवा ....

३. ती वेळ येईपर्यंत आपल्या हाती असलेली गुंतवणूक - योग्य रक्कम नाहक खर्च होऊन जाऊ नये म्हणून ती रक्कम बँकेच्या मुदतठेवित गुंतवणे सयुक्तिक ठरेल. तसं करताना संपूर्ण रकमेची एकच एफडी करण्यापेक्षा ती विभागून केल्यास जसजशी संधी येत जाईल तसतशी एक -एक एफडी मोडणे सोयीचे जाईल.

४. एक गोष्ट इथे स्पष्ट केली पाहिजे की, ही आणि अशी चर्चा पेन्शन प्लान आणि विमा यांना लागू नाही. या दोन गोष्टी कधीही ताबडतोब केल्याच पाहिजेत.

५. असा विचार करत असताना जितका स्वतःच्या शेअर्स पोर्टफोलिओचा विचार केला जातो तेवढा म्युच्युअल फंड, विशेषतः एसआयपीचा (सिस्टमिक इनवेस्टमेंट प्लान) विचार केला जात नाही.

हे योग्य नाही.

ते परवडणारे आहे की नाही हे ज्याचे त्याने ठरवलेले बरे !

स्वतःच्या म्युच्युअल फंड पोर्टफोलिओचा विचार करत असताना त्यातल्या प्रत्येक योजनेची सध्याची NAV, आपण त्यात गुंतवणूक करायला सुरवात केल्यापासून त्यात झालेले बदल, आपण प्रत्येक योजनेत प्रत्यक्षात गुंतवलेले पैसे आणि त्याचे आजचे मूल्य आणि त्या योजनेने वेळोवेळी दिलेला लाभांश याचा

व्यासंगी माणसाला आपण आदर दाखवितो यातच वाङ्मयाची भरपूर प्रशंसा झाली. - इमरसन

विचार केला पाहिजे.

असा अभ्यास सहजपणे स्टेटमेन्ट वरून करता येतो.

त्या अभ्यासातून जर लक्षात आले की, एखाद्या योजनेत आपणांस नुकसान होत आहे तर वेळीच त्या योजनेतून पूर्णपणे बाहेर पडणे श्रेयस्कर ठरते.

त्याचबरोबर ज्या योजनेतून चांगला नफा होत आहे अशा योजनांबाबत दुहेरी धोरण अवलंबणे हिताचे ठरू शकते. याचा पहिला भाग म्हणजे एकीकडे यात पैसे गुंतवणे सुरूच ठेवायचे आणि दुसरे म्हणजे या योजनांत होणारा नफा वेळोवेळी प्रत्यक्षात हातात पाडून घेत राहायचे (प्रॉफिट-बुकिंग) आणि हा नफा स्वतःच्या रिटायरमेंट कॉर्पस मधे गुंतवत राहायचे.

६. जो प्रकार मुच्युअल फण्डाच्या योजनांचा तोच शेअर्सचाही.

बघू या थोडं ....

आपल्या गुंतवणुकीचे ॲन्यूअल स्टॉक - टेकींग ....

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

(पृष्ठ क्र.१४ वरून- **ओळख वनस्पतींची**)

सावलीसाठी तसेच शोभेसाठी लावण्यास अगदी योग्य आहे. याची फारशी मिजास नसते. लावल्यानंतर एक-दोन वर्ष काळजी घेतल्यावर पुढची काळजी वृक्ष स्वतःच घेतो. मात्र याला कोरडे हवामान मानवत नाही. या वृक्षाची साल, फळे आणि बिया विविध आजारांवर औषध म्हणून वापरतात. साल पंडूरोग आणि कोडात वापरतात. फळ तुरट, पाचक, मृदू, विरेचक आणि कृमीनाशक आहे. तसेच खोकला, स्वरभंग तसेच डोळ्यांचे रोग यावरही उपयोगी आहे. अर्थात कोणत्याही औषधाचा वापर तज्ज्ञांच्या देखरेखीखाली करणे आवश्यक आहे.

बेहड्याचे असे अनेक गुण आहेत. पण मला भावला तो एक सौंदर्य वृक्ष म्हणून. पावसाळ्यात जंगलात फिरताना याच्या झुपकेदार पानांवर गोळा झालेले व खालच्या पानांवर टपटपणारे पाण्याचे थेंब पाहताना मी भान विसरतो. पानांचा लाल गुलाबी रंग जसा मोहात पाडतो तसा हिरवा गर्द रंग देखील आपल्याला आकर्षून घेतो. या झाडाची फुले मात्र लहान अन् मंजिऱ्यांच्या स्वरुपात असतात. पानांच्या पसाऱ्यात बरेचदा ती दिसतही नाहीत. फळे जंगली बदामासारखीच गोल लांबुळकी असतात. त्यांचा मुख्य वापर त्रिफळा चूर्णासाठी होत असला तरी जंगलातील जनावरांचे ते आवडते खाद्य आहे. असा ही बहुगुणी वृक्ष आपल्या परिसरात सहज लावता येईल. बेहड्याच्या रंगोत्सवाचा आस्वाद जंगलात न जाताही घेता येईल.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी - ९८६९५४१९६६

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था
(भाग–३)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत – संपादक*

समुद्रकिनाऱ्यापाशी जे गांव वसले आहे आणि जेथे बंदरातून आलेल्या सामानाच्या खरेदीविक्रीचा व्यवहार चालतो ते स्थान 'वनस्थान' या नावाने ओळखले जाते.

'देशांतर्गतजनैरेवं नानाजातिभिरन्वितम् ।
पट्टणं तत्समाख्यातं वैश्यैरध्युषितं तु यत् ।।९।।'

ज्या गावांतील लोक (व्यापारासाठी) परदेशांत जाऊन आले आहेत, जेथे विविध जातींचे लोक रहातात आणि जेथे प्रामुख्याने व्यापारी जनांची वस्ती आहे त्या गावाला 'पट्टण' असे संबोधले जाते.

'नगर्यावर्तकं यत्तत्खर्वटं तूदाहृतम् ।
वने जनपदे चैव केवले शूद्रसेविताः ।।१०।।

जेथे अनेक जातींचा समुदाय रहातो ते 'खर्वट' या नावाने ओळखले जाते. वनांत आणि अत्यंत लहान गावांत फक्त चाकरमानी (सुतार, बांधकाम मजूर, लोहार, वगैर) लोक रहातात.

'कर्णकः खेटको ग्रामः क्रमात् त्रिविध ईरितः ।
सामन्तानां समृध्दानां तु यत्स्थानं शिबिरं स्मृतम् ।।११।।'

आणखी तीन प्रकारची गांवे आहेत ती 'कर्णक', 'खेटक' आणि ग्राम या नावाने ओळखली जातात. जेथे सरदार (सामन्त–राजपरिवाराच्या नात्यातले) आणि धनवान् लोक रहातात, ते स्थान शिबिर या नावाने ओळखले जाते.

'गजवाजिसमायुक्तं सेनामुखमिहोच्यते।
राजवेश्मसमायुक्तं सर्वजातिसमन्वितम् ।।१२।।
गुहयप्रदेशसंयुक्तं सेनामुखमिहोच्यते ।
आगन्तुकानां सर्वेषां नैष्ठिकानां निवासभूः ।।१३'

जेथे हत्तीदल, घोडदळ, सैन्याचे मुख्यालय, राजवाडा आणि सर्व जातीचे लोक (पूर्णतया सुरक्षित) अशा ठिकाणी असतात आणि ज्या ठिकाणी सेवेच्या गुप्त वसाहती असतात, अशा वसाहतीला 'सेनामुख' (Cantonement) असे संबोधले जाते. अशा ठिकाणी बाहेरील गांवातून आलेल्या आणि खडतर मानसिक तपश्चर्या किंवा कठिणतम श्रम, योग्य कार्यासाठी करणाऱ्या तपस्वी जनांसाठी पण वस्तीचे प्रयोजन केलेले असते.

'अन्नपानीसंयुक्तः केवलो वा मठो मतः।
विद्यास्थानं तु तद्वत्स्याब्द्हुसेनासमन्वितम् ।।१४।।'

जेथे सर्व सेनादलाच्या (पायदल, अश्वदल, रथसेना, हत्तीदल) यांच्या वसाहती असतात आणि शास्त्रांच्या अध्ययनाचीही वसाहत असते, अशा स्थानाला 'मठ' (विद्यापीठ) असे संबोधले जाते.

'राजवेश्मसमायुक्ता राजधानीति कथ्यते ।
ग्रामादीनां समीपं यत्तत्स्थानं कुब्जकं स्मृतम् ।।१५।।

ज्या गावात राजपरिवाराचे निवासस्थान व कार्यालय आहे त्या गावाला 'राजधानी' असे संबोधले जाते. गावाजवळच असलेल्या अगदी छोट्या (एक–दोन सदनांच्या) वसाहतीला 'कुब्जक' असे संबोधले जाते.

'तदेव चेरिका प्रोक्ता नगरीतन्तुवायभूः ।
सर्वेषामपि चैतेषां ग्रामादीनां समीरितम् ।।१६।।'

ज्या ठिकाणी विणकरांची वस्ती आहे आणि कांही भाग ओसाड (निर्जन) आहे त्याला 'चेरिका' असे संबोधले जाते.

आतापर्यंत 'अग्रहार, 'ग्राम', 'कुब्जि', 'नगर', 'वनस्थान', 'पट्टण', 'खेटक', 'शिबिर', 'सेनामुख', 'राजधानी', 'कुब्जक', 'चेरिका' या गावांची वैशिष्ट्ये सांगितली. यानंतर 'कामिकागम' (स्थापत्यवेद) याचे ग्रंथकार गावांची प्रवेशद्वारे, त्यांच्या आतील भागांचा आणि रस्त्याबद्दलचा तपशील देत आहेत.

**वीथिद्वारादिमानम् ।**

**रस्ते, उप-रस्ते आणि त्यांची प्रवेशद्वारे,**

'वीथिद्वारादिमानं तु प्रवक्ष्याम्यनुपूर्वशः ।
ब्रह्मभागावृता वीथी नाभिवीथीतिउच्यते ।।१
राजवीथीति विख्याता ग्रामोदर्बहिरावृत्ता ।
सैव मङ्गलवीथीति रथवीथीति उच्यते ।।२।।'

गावाच्या मध्यभागी असलेल्या मंदिराकडे येणाऱ्या रस्त्याला नाभिविथी असे संबोधले जाते. गावाच्या बाहेरून वळसा घालून जाणाऱ्या रस्त्याला मंगलविथी किंवा रथविथी असेंही संबोधले जाते.

'प्राङ्मुखा वीथयस्सर्वा नाराचाख्या इति स्मृताः ।
ता एव जनवीथ्यस्तु क्षुद्रास्तिर्यग्गता मताः।।३।।'

पूर्वेकडे जाणारे सर्व रस्ते जलद वाहतुकीसाठी (वेगळे) ठेवले जातात. पण (पश्चिमेकडे) इतरत्र जाणारे फारसे महत्त्वाचे मानले जात नाहीत. सर्वसामान्य जनता आणि मनुष्येतर प्राण्यांसाठी त्यांचा वापर होतो.

'पाददण्डं समारभ्य पादपादविवर्धमम्।
स्यादेशकादशदण्डान्तं वीथिमानमिहागमे ।।४।।'

रस्त्यांची उंची १/४ दण्ड इथून सुरू होऊन ११ दण्ड इतक्या रुंदीइतकी वाढत जाते. रस्त्याचे मानले गेलेले मापक हे वर दिल्याप्रमाणे आहे.

**कामिकागम**

**'ग्रामादिविन्यासविधिः'**

**नगररचनेसंदर्भातील निकष व नियम**

'विन्यासस्य विशेषोडयं ग्रामादीनामिहोच्यते ।
ग्रामश्शरीरमङ्गं स्याद्देवमर्त्यपरिग्रहः।।१।।

आता नगररचनेसंदर्भातील नियमाबद्दलची माहिती देत आहे. कोणत्याही राज्यांत ग्राम हा त्या राज्याचा पायाभूत भाग आहे.

'उपाङ्गमिति बोध्दव्यं विमानभवनादिकम् ।
पदप्रस्तरसूत्रे वा मध्यसूत्रद्वयेडपि वा ।।२'

नगराच्या शेवटी किंवा मध्यभागांत बांधलेली मोठी (तीनमजली-चारमजली) वास्तु ही त्या नगराचाच एक भाग म्हणून मानली जावी.

अंशाच्या कोनांतून विभागणाऱ्या रेषेच्या भागांत (Along The Diagonal line) छोट्या वास्तूंची रचना करू नये. तसेच रस्त्याच्या एका टोकालाही कोणत्याही वास्तूची रचना करू नये. नगराच्या टोकाला रस्त्याची लांबी आणखी वाढवू नये.

'यथा भक्तेथा कार्यं न कार्यं सूत्रपीडनम् ।
दण्डच्छेदो न कर्तव्यो ग्रामे वाऽपि गृहायते ।।४।।'

रस्त्याची आखणी करतांना त्यांत कोणताही अडथळा येणार नाही अशा पद्धतीने करावी. रस्त्याच्या मध्यभागी कोणतीही रचना (चबुतरा-व्यासपीठ वगैरे) करू नये. रस्त्याची रुंदी पूर्ण दण्डाच्या मापात असावी. (उदा. ११/२, २१/२, ३१/२, ४१/४ दण्ड अशी असू नये.) तसेच लंबगोलाकार (Rectangle) अशा गृहाची

रचना पण करू नये.

'बाहयश्रेणिषु वृध्दिश्च दण्डच्छेदश्च वीथिषु ।
पदशेषयुतं वेश्म छिन्नदण्डं गृहादिकम् ।।६।।
इष्टभात्रं च वीथीनां वास्तुकर्मणि शस्यते ।
श्रेण्यन्तरेषु तत्रैव पदशेषं समापयेत् ।।७।।
चण्डालानां प्रवेशाय निर्गमाय मलस्य च ।
जलस्य निर्गमार्थं तु क्षुद्रमार्गाः प्रशंसिताः ।।८।।'

सेवक वर्गासाठी (कनिष्ठ जातीच्या साठीपण) आणि जलनिर्गमवाहिनीसाठी तसेच जलवाहिनीसाठी कमी रुंदीचे रस्ते असावेत.

देववश्मगृहादीनां मार्गस्य च विशेषतः ।
शोध्यानां संशये मार्गे निक्षिपेच्छून्यदेशके ।।१६।।
श्लेष्मातकं वटञ्चापि कटकच्याप्युदुम्बरम् ।
आरग्वध्वं तथाश्वत्थं निम्बं प्लक्षं च वर्धयंत् ।
प्रदक्षिणाक्रमादेतामीशान्यष्टदिक्ष्वपि ।।१८।।
वृक्षास्थाप्या बहिर्वास्तौ चैत्यवृक्षा भवन्त्यमी ।
एते दोषहरा प्रोक्ता ग्रामादीनां विशेषतः ।।१९।।

जेथे देवतांची मंदिरे आहेत आणि (तेथील निर्भय वातावरणामुळे) संशयित व्यक्ती मुक्ततेने हिंडत असतात त्या ठिकाणी केवडा, वड, औदुंबर, कटक (बाभूळ), कोरफड वगैरे वृक्ष वनस्पतींची लागवड करावी. (केवडा वड, औदुंबर देवतांसाठी तर बाभूळ, कोरफड संशयित व्यक्तिंसाठी). अश्वत्थ, लिंब आणि पिंपळ वृक्ष प्रदक्षिणाक्रमावर आणि ग्रामाच्या आठही दिशांना लावावेत. घरामध्ये चैत्यवृक्ष लावावेत. या झाडांमुळे रोगराईपासून मुक्तता मिळते.

(क्रमशः)

**– मधुकर गजानन दातार**

•••

(पृष्ठ क्र.१९ वरून- **लॉर्ड लिटन : ब्रिटिशकालीन भारताचे वादग्रस्त गर्व्हनर–जनरल** )

कर उठविण्याचा निर्णय घेतला. लिटन यांच्या या निर्णयाला गव्हर्नर–जनरल यांच्या कार्यकारी मंडळातील (Governer General's Executive Council) बहुतांशी सदस्यांनी विरोध केला. परंतु लिटन यांनी गव्हर्नर जनरलला असलेल्या विशेष घटनात्मक अधिकाराचा वापर करून त्यांचा हा निर्णय रेटून नेला. यावरून भारताचा उपयोग ब्रिटनच्या फायद्यासाठी करण्याचे धोरण याकाळात अवलंबिले गेल्याचे निदर्शनास येते.

(क्रमशः)

**संदर्भ :**

अ न्यू लूक अॅट मॉडर्न इंडियन हिस्ट्री : बी. एल्. गोव्हर अलका मेहता

गव्हर्नर्स–जनरल अँड व्हाईसरॉयीज् ऑफ इंडिया : एस्. आर. बक्षी

हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया : अ डिटेल्ड स्टडी ऑफ पोलीटिकल, इकॉनॉमीक, सोशियल अँड कल्चरल आसपेक्टस् : एस्. सी. रेचौधरी

आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९२७) : डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर

ऑक्सफर्ड डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफीज्

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

# मानसिक आरोग्य क्षेत्रातील एका 'सा'ची कथा?

*मानसिक आजारांचे प्रमाण सध्या वाढत आहे. या आजारांवर काम करणाऱ्या एका 'सा' (स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन, पुणे) नावाच्या संस्थेची ओळख करून देणारा डॉ. अनिल वर्तक यांचा लेख- संपादक*

**मानसिक आजारांसंबधी सद्य परिस्थिती**

स्किझोफ्रेनिया अथवा मानसिक आजार हे शब्द ऐकले तरी अनेक जण अस्वस्थ होतात. काही तरी गंभीर गोष्टीसंबंधी चर्चा होत आहे हे त्यांच्या कपाळावरील आठ्यांवरून लगेच लक्षात येते आणि मग होता होईल तो लांब राहावे हाच विचार मनात प्रबळ होतो. परंतु याच मानसिक आजारांसाठी समाजात आधार, दिशा आणि मार्गदर्शन उपलब्ध व्हावे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून पुण्यातील काही जिद्दी कार्यकर्ते पाय रोवून उभे राहिले, येणाऱ्या सर्व समस्यांना तोंड दिले. सामाजिक पातळीवर आधार देणारी एक व्यवस्था उभी करू पाहणाऱ्या या कार्यकर्त्यांचा धीरोदात्त प्रवास म्हणजेच स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोशिएशन अर्थात 'सा' चा प्रवास आपण या लेखात पाहणार आहोत.

मानसिक आजारांमध्ये वेगवेगळे प्रकार आहेत. उदा. स्क्रिझोफ्रेनिया, मेजर डिप्रेशन, बायपोलर मूड डिसआर्डर, पर्सनॅलिटी डिसऑर्डर (व्यक्तिमत्त्व दोष) यांसारखे आजार गंभीर मानसिक आजारांमध्ये मोडतात. त्याचप्रमाणे नैराश्य (डिप्रेशन) फोबिया (भीती वाटणे), अँक्झायटी (चिंतारोग) इत्यादी आजार सामान्य मानसिक आजारात गणले जातात. कोणत्याही एका वेळेला लोकसंख्येच्या साधारण एक ते दोन टक्के लोकांना गंभीर मानसिक आजार असू शकतो, तर साधारण पाच ते सहा टक्के लोकांना सामान्य मानसिक आजार असू शकतो. संपूर्ण आयुष्याचा विचार केला तर दर चार पैकी एका व्यक्तीला मानसिक आजार होऊ शकतो. स्त्री/पुरुष, धर्म, जात, वंश, सामाजिक आणि आर्थिक स्तर काहीही असो, मानसिक आजारांचे हेच प्रमाण संपूर्ण जगभर दिसून येते.

बहुतेक मानसिक आजारांची सुरवात तारुण्याच्या अवस्थेत म्हणजे १८ ते २५ या वयात होते. व्यक्तींमध्ये गंभीर मानसिक आजाराचा कल (tendency) अनुवंशिकतेने येतो. त्या काळात घडणाऱ्या अत्यंत ताणदायक घटनेमुळे उदा. – परीक्षेतील अपयश, प्रेमभंग, प्रिय व्यक्तीचा मृत्यू इत्यादींमुळे – सुप्त स्वरूपात असलेल्या आजाराला चालना मिळते. ते केवळ निमित्त होते व आजार व्यक्त (manifest)होतो. सभोवतालच्यांना वाटते की ती अति ताण निर्माण करणारी घटनाच त्याच्या आजारपणास कारणीभूत आहे. प्रत्यक्षात मात्र तसे नसते. मानसिक आजारांविषयी समाजात असलेल्या अनेक गैरसमजांपैकी हाही एक गैरसमज आहे..

गंभीर मानसिक आजारांमधील स्क्रिझोफ्रेनिया आजारामुळे जवळच्या व्यक्तीचे अक्षरशः अनोळखी व्यक्तीत रूपांतर होते. आयुष्याचा प्रवास अत्यंत चढ–उताराचा करणारा हा आजार, आजूबाजूचे जग अर्थपूर्ण वाटत असताना अचानक भूलभुलैय्यामध्ये नेणारा बाह्य आणि आंतरिक गोष्टींची कोडी घालणारा, मेहनतीने बांधलेल्या आयुष्याच्या इमारतीला पायरीपायरीने तडा जावा असा तो आजार. अनेक चमत्कारिक आणि ताब्यात न राहणारे विचार आणि वेगवेगळ्या प्रकारचे भास यामुळे वास्तवापासून (reality) दूर नेणारा आणि काल्पनिक (fantasy) आयुष्यामध्ये जगण्यास लावणारा असा तो आजार. त्या आजाराने त्रस्त व्यक्तीची तिच्या करिअरवरची, नातेसंबंधांवरची पकड ढिली होते. तिचा स्वतःवरचा आणि जगावरचा भरवसा उठतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या व्यक्तीला स्वतःला या सगळ्या बदलांबाबत काही करता येत नाही! असा हतबल

पावसानंतर ऊन जसे सुखकारक असते, तसे प्रेम हे आत्म्याला सुखदायक असते. – शेक्सपीअर

करणारा हा आजार आहे -स्क्रिझोफ्रेनिया. ऑस्कर विजेत्या 'अ ब्युटीफुल माइंड' या चित्रपटात नोबेल पारितोषिक विजेत्या जॉन नॅश याचा जीवनप्रवास स्किझोफ्रेनिया या आजारामुळे होणाऱ्या उलथापालथीच्या पार्श्वभूमीवर समर्पकपणे दाखवला आहे.

कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत आजार दोन पातळ्यांवर उद्‌भवतो. एक म्हणजे शारीरिक आजार आणि दुसरा म्हणजे मानसिक आजार. मानसिक आजारामुळे व्यक्तीचे विचार, भावना आणि वर्तन यात बदल होऊ लागते. आजाराची लक्षणे अचानक तीव्र स्वरूप (acute) धारण करू शकतात किंवा लक्षणांची तीव्रता मंदगतीने (Chronic) वाढू शकते.काही जणांना भास होणे, भ्रम होणे, टोकाचे नैराश्र येणे,त्याच-त्याच गोष्टी पुनः पुन्हा करणे अशा प्रकारची गंभीर लक्षणे आढळून येतात. अशा गंभीर लक्षणांमुळे व्यक्तीला तिचे सर्वसामान्य माणसासारखे आयुष्य जगण्यात म्हणजे शिक्षण, लग्न, नोकरी, नाती अथवा सामाजिक संबंध टिकवून ठेवण्यात अडचणी येतात. तर काही जणांना चिंताग्रस्तता, सौम्य नैराश्य अथवा काही गोष्टींबद्दल भीती अशी तुलनेने सौम्य लक्षणे आढळून येतात. सौम्य लक्षणांमुळे सर्वसामान्य जीवनात येणारे अडथळे मर्यादित असतात आणि अशी लक्षणे उपचारांनादेखील चांगला प्रतिसाद देतात.

वैद्यकशास्त्रात सातत्याने चाललेल्या संशोधनांमुळे शारीरिक आजारांची कारणे आणि उपाय सर्वसामान्य लोकांना देखील चांगली परिचित झालेली आहेत. त्यामुळे आवश्यक ते वैद्यकीय उपचार तर वेळेवर केले जातातच आणि त्याचबरोबर रुग्णाबद्दल सहानुभूती वाटणे, त्याला समजून घेणे, आधार देणे, सेवाशुश्रूषा करणे आणि सर्व प्रकारची मदत करणे या गोष्टीदेखील आपल्याकडून सहजपणे होतात. शारीरिक आजारी रुग्णाबद्दल कुटुंबीय आणि इतरांकडून मिळणारा आधार आणि प्रोत्साहनपर वातावरणामुळे बरे होण्याचा रुग्णाचा उत्साह वाढतो.

दुर्दैवाने, मानसिक रुग्णांबद्दल नेमकी उलट परिस्थिती असते. खरं तर मानसिक आजार हा इतर कोणत्याही शारीरिक आजारांसारखाच आहे. मेंदूमध्ये जी रासायनिक द्रव्ये असतात त्यांच्यातील बिघडलेला असमतोल हे मानसिक आजार उद्‌भवण्याचे प्रमुख कारण आहे. मेंदूमधील जैवरासायनिक अशा बदलांची कारणे कोणती आणि ती दुरुस्त करण्यासाठी कोणते उपाय आहेत यावर सातत्याने संशोधन चालू आहे. निरनिराळी औषधे आणि अन्य उपचार विकसित झालेले आहेत. आजार पूर्णपणे बरा होईल असे औषधोपचार अजूनही हाती लागले नसले तरी आजाराची लक्षणे खूपशा प्रमाणात नियंत्रणाखाली ठेवता येतील अशी प्रभावी औषधे आज उपलब्ध आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार घेतलेल्या औषधांच्या नियमित वापराने आजाराची लक्षणे ताब्यात ठेवता येतात.

परंतु दुर्दैव असेकी मानसिक आजारी व्यक्तीला आणि कुटुंबाला समाजातून सहकार्याचा हात तर मिळत नाहीच; उलट उपेक्षा आणि तिरस्कारच त्यांच्या वाट्याला येतात. त्यामुळे आजारी व्यक्तीचा (आणि कुटुंबाचा) एकलकोंडेपणा पोसला जातो, समाजीकरणात अडथळे येतात, समाजात राहून गमावलेली कौशल्ये मिळवण्याची संधी उपलब्ध होत नाही आणि मूळचा आजार बळावतो. मानसिक आजारांची सामाजिक व भावनिक गुंतागुंत लक्षात घेता केवळ औषधोपचाराने रुग्णाला मदत करण्याचे काम पूर्ण होणार नाही, तर रुग्णाचे कुटुंबीय आणि आजूबाजूचा समाज यांनादेखील आजारी व्यक्तीच्या सुधारणेच्या प्रक्रियेस हातभार लावावा लागेल.

**एकलव्य स्वमदत गटाची सुरुवात**

एकलव्य या गटाची सुरवात ही खरं तर मानसिक आजारी व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांचे अज्ञान, उपेक्षा यांची कोंडी फोडून आणि समाजामध्ये आधार देणारी व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी झाली.कोणत्याही संस्थेसाठी सुरुवातीचा जडणघडणीचा हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असा असतो. मानसिक आजारी रुग्ण

आणि पालक यांच्यासाठी 'एकलव्य' गटाची सुरुवात पुण्याच्या आपटे प्रशालेत १९९७ साली झाली. त्यावेळच्या पुण्यात देखील हा धाडसी प्रयोग होता. समाज कसा बघेल, लोक येतील की नाही येतील, सगळीच अनिश्चितता होती. पुण्यातील ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. लुकतुके यांचे सुरवातीच्या काळातील योगदान महत्त्वाचे होते. डॉ. हेमंत चांदोरकर आणि डॉ. संज्योत देशपांडे यांनी देखील काही काळ मोलाची साथ दिली. परंतु सातत्याने साथ दिली ती मानसिक आजाराचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या काही व्यक्ती आणि रुग्णांचे कुटुंबीय यांनी. या नवीन उपक्रमाकडे ते उत्सुकतेने आणि आशेने बघत होते. एखादी नवीन सामाजिक संस्था निर्माण व्हावी आणि त्यातून स्वतःला, त्याचप्रमाणे इतरांना आधार, मार्गदर्शन, दिशा मिळत राहावी ही त्यांची प्रामाणिक इच्छा होती. रघुनाथ आचार्य, दत्तात्रय देशपांडे, अरविंद हळबे, फरांदे, प्रभाकर मुजुमदार आणि रायरीकर हे सर्व ज्येष्ठ पालक या उपक्रमात सहभागी होते.

श्रीयुत रघुनाथ आचार्य हे त्यापैकीच एक प्रातिनिधिक पालक. मुलीच्या आजारासाठी अनेक वर्षे विविध प्रकारच्या ट्रीटमेंट्स घेतल्यानंतर समाजाकडून काही आधार मिळेल का हा त्यांचा शोध चालू झाला. मानसिक आजाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले अनिल वर्तक म्हणतात 'दर शनिवारी आमच्या सभा भरत असत. एकलव्य गटाच्या सुरुवातीपासून आचार्य आणि अनेक पालक माझ्या पाठीशी कायम उभे राहिले. निराशेचे अनेक प्रसंग आले; पण पालकांच्या अढळ सहकार्यामुळेच आम्ही स्वमदत गट चालू ठेऊ शकलो.

पालकांबरोबरच या समस्येची माहिती/जाण असणाऱ्या व्यक्ती देखील एकलव्याच्या आणि नंतर 'सा च्या कामात स्वयंसेवक म्हणून मदत करू लागल्या. ही सर्व माणसे आयुष्यभराचे त्यांचे संचित-अनुभव, वेळ, कौशल्ये या कार्यासाठी सेवाभावी पद्धतीने देऊ लागले. नीलिमा बापट, गुरुदत्त कुंदापुरकर आणि स्मिता गोडसे यांचा सहभाग अशा अंगाने होता. नीलिमाताई आणि स्मितातार्ई यांच्या भाषा कौशल्यामुळे लिखाणाची, संपादनाची आणि स्वमदत गटाची जबाबदारी त्यांनी पेलली. गुरुदत्त यांनी लार्सन अँड टुब्रो (LT) कंपनीमध्ये मार्केटिंग विभागात मोठी जबाबदारी पेललेली होती आणि त्यांच्या लेखन, भाषण, संवादकला सर्जनशील दृष्टिकोन आणि नियोजनकौशल्य अशा गोष्टींचा संस्थेला बहुमूल्य उपयोग झाला. कोणतीही संस्था जेव्हा मोठी होते तेव्हा ती केवळ वास्तू अथवा पैसा यांनी नव्हे, तर तिला दिशा देणाऱ्या या अनेक व्यक्तींच्या योगदानातून. थोडक्यात या 'सा' मध्ये छोटे-छोटे अनेक 'सा' आहेत आणि हे सर्व सा आपापल्या परीने 'सा' साठी आपापल्या कार्यक्षमतेचे सर्वोत्तम योगदान करत आहेत.

'सा' चा हा अनुभव अनेक ठिकाणी पोहोचावा हीच या सर्वांची इच्छा आहे. अनेक ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ कुलकर्णी म्हणतात, 'आम्ही मनोविकारतज्ज्ञ रुग्णाच्या आजारावर काम करतो, औषधे आणि इतर उपचार आम्ही देतो. परंतु पालक आणि रुग्ण यांच्यासाठी ज्या आधारगट आणि इतर अनेक सेवा समाजात उपलब्ध असाव्या लागतात त्या मात्र आम्ही देऊ शकत नाही. मानसिक आजारात उपचारांची जेवढी गरज आहे तेवढीच गरज आधार गटांचीही आहे. कलंकाच्या भावनेमुळे लोक गटामध्ये सामील होत नाहीत अथवा पुढाकार घेत नाहीत.रुग्णाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर डॉक्टर अथवा समुपदेशक देऊ शकत नाहीत.

वीस वर्षांपूर्वी पुण्यामध्ये देखील अशक्य वाटणारा एक विचार आता चांगलाच रुजला आहे. एकलव्य या छोट्याशा बीजातून तो आता 'सा' च्या रुपात कार्यरत आहे. त्याला नव-नवीन धुमारे फुटले आहेत, फळा-फुलांनी तो बहरत आहे आणि त्याची विचारबीजे इतरत्र रुजायला उत्सुक आहेत. वाट पाहात आहेत ती आमंत्रणाची, सहकार्याची, लढाऊ वृत्तीची. कदाचित ही विचारबीजे नूतन भूमीवर आणखीन जोमाने वाढू लागतील कारण या विचारबीजांनी आता अनुवंशिकते बरोबरच अनुभवाची देणगी देखील मिळवलेली आहे.

जे चमकते ते सारे सोनेच होय असा भ्रम निर्माण करणारा मूर्खपणा म्हणजे प्रेम. - बर्नार्ड शॉ

या बिजांमधून वटवृक्ष कोठेही होऊ शकतो हेच पुण्याच्या अनुभवातून आपल्याला शिकता येते. प्रत्येक मोठ्या शहरात अशा कामाची गरज आहे. एकटेपण, दिशाहीनता आणि असहाय्यतेची ही रुग्ण आणि पालकांची कोंडी आता फोडायलाच हवी.

त्याच सुमारास 'एकलव्य' नावाचा स्वमदत गट मानसिक आजारी व्यक्ती व त्यांचे पालक यांच्यासाठी चालवला जात होता. त्यामागे प्रेरणा होती अनिल वर्तक यांची. त्यांनी स्वत: मानसिक आजाराचा अनुभव घेतला आहे. 'सा'च्या स्थापनेनंतर 'एकलव्य' हा स्वमदत गट 'सा'चा अविभाज्य भाग बनला. मानसिक आजारांवरील लेख वाचून; तसेच, रेडिओवरील भाषणे ऐकून स्वयंसेवी कार्यकर्ते संस्थेला मिळत गेले आणि संस्थेचा विस्तार होत गेला.

**'सा' चा विस्तार**

इवलेसे रोप लावियेले द्वारी.. या उक्तीप्रमाणे एकलव्य गटाच्या रोपापासून 'सा' ची सुरवात झाली. अगदी सुरुवातीपासून काम करत असलेल्या पालक आणि स्वयंसेवक यांच्यामुळे संस्थेच्या कामाची प्राथमिक जडणघडण पक्की झाली होतीच. परंतु संस्थेच्या अस्तित्वासाठी आणि वाढीसाठी एवढ्या गोष्टी पुरेशा नसतात. संस्थेला साधनसंपत्तीही लागतेच. 'सा'चे संस्थापक डॉक्टर जगन्नाथ वाणी यांनी ही जबाबदारी उचलली. धुळ्यात जन्मलेले डॉ. वाणी नंतर शिक्षणासाठी कॅनडाला गेले आणि मग तेथेच स्थायिक झाले.

डॉ. वाणी यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने कॅनडातील कॅलगरी येथे स्किझोफ्रेनिया आजारासंदर्भात काम केलेले होतेच. भारततही मानसिक आजारी रुग्णांची संख्या मोठी आहे. परंतु या आजाराविषयीची जाणीव, जागृती समाजात कमी असल्यामुळे रुग्ण आणि कुटुंबीयांना खूप त्रास सोसावा लागतो याची त्यांना जाणीव होती. या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेची आवश्यकता आहे याची जाणीव त्यांना होती. या जाणिवेतून डॉ. वाणी यांनी काही समविचारी लोकांना बरोबर घेऊन स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन या संस्थेची स्थापना १९९८ मध्ये केली.

आर्थिक मदत आणण्याची सर्व जबाबदारी 'सा'चे संस्थापक डॉक्टर वाणी यांनी उचलली आणि एकहाती पार पाडली. कॅनडातील महाराष्ट्र सेवा समिती आणि सिडा (CIDA) यांच्याकडून त्यांनी प्रोजेक्ट स्वरूपात मदत आणली. या निधीच्या माध्यमातूनच संस्थेची वास्तू उभी राहू शकली आणि देवराई चित्रपटाची निर्मिती झाली. 'सा' बरोबरच महाराष्ट्रातल्या अनेक सामाजिक संस्थांना आर्थिक मदत उपलब्ध करून देणारे डॉ. वाणी मात्र, 'स्वत:ची भूमिका केवळ टेलिफोन ऑपरेटरची आहे– निधी देणारी संस्था आणि सामाजिक संस्था यांच्यात संवादाचे पूल बांधण्याची आहे' असे नम्रपणाने म्हणत असत.

संस्थेची स्वत:च्या मालकीची वास्तू २००७ साली तयार झाली आणि बाळासाहेब ओक यांच्या अध्यक्षतेखाली संस्था नव्या जोमाने काम करायला सिद्ध झाली. 'सा' ही संस्था तीन स्तरांवर काम करते. मानसिक आजाराविषयी समाजाचे प्रबोधन करणे आणि या आजारांविषयी असलेला कलंकाचा दृष्टीकोन कमी करणे, स्वमदत गट स्थापन करणे आणि रुग्णांसाठी पुनर्वसन अथवा कृतीकेंद्र स्थापन करणे ही तीन प्रमुख उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेवून संस्थेची वाटचाल चालू झाली.

माणसांची अचूक पारख करता येणे आणि सामजिक कार्यात त्यांना जोडून घेणे ह्या गोष्टीत डॉ. वाणी यांचा हातखंडा होता. बाळासाहेब ओक आणि हरिभाऊ आठवले हे त्यांचे महाविद्यालयापासूनचे मित्र. या दोघांना संस्थेच्या कामासाठी वाणीकाकांनी जोडून घेतले. बाळासाहेबांना बांधकाम व्यवसायाचा दांडगा अनुभव. संस्थेची वास्तू उभी करताना त्यांच्या अनुभवाचा खूप उपयोग झाला. हरिभाऊ हे व्यवस्थापन क्षेत्रातील. संस्थेसमोरच्या समस्या हाताळताना तर्कशुद्ध विचार कसा करावा, निरनिराळ्या पर्यायातून योग्य पर्याय कसा निवडावा

उथळ लोकांचा दैवावर विश्वास असतो, तर सामर्थ्यवान लोकांचा कार्यकारणावर. – इमरसन

यावर त्यांचा भर आणि त्यामुळे गुंतागुंतीचे अनेक निर्णय घेताना संस्थेला त्यांच्या अनुभवाचा फायदा झाला. डॉ. वाणी यांच्यानंतर यशवंत ओक यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. २०१० सालापासून अमृत बक्षी हे अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत. एक पालक म्हणून श्री. बक्षी संस्था बघायला पुण्याला आले. 'सा' च्या कामकाजाची माहिती करून घेतल्यावर, अनुभवल्यावर त्यांनी पुण्याला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. मानसिक आजारांसंबंधी उपचार, संशोधन आणि प्रशिक्षण या बाबतीत भारतातील सर्वोच्च अशा 'निम्हान्स' संस्थेच्या समितीतदेखील बक्षी यांचा समावेश झालेला आहे.

माणसांची वसतिस्थाने नदीकाठी असतात आणि तिथेच त्यांची जीवन संस्कृती समृद्ध होते तसे सामाजिक संस्थांची वसतिस्थाने सेवाभावी आणि निर्मितीक्षमता असणारे कार्यकर्ते यांच्या काठी विकास पावतात, समृद्ध होतात. संस्थेला तशा प्रकारचे कार्यकर्ते सुरवातीपासूनच मिळाले असल्यामुळे तुलनेने कमी कालावधीत संस्थेचा अनेक अंगांनी विकास झाला. परंतु पुढील वाटचालीत देखील संस्थेचा तंबू एकखांबी असून चालणार नाही. वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करणारे केडर्स/मनुष्यबळ तयार करावे लागते. वेगवेगळ्या पातळ्यांवर आणि वेगवेगळ्या क्षमतेने काम करणारी ही माणसे म्हणजेच संस्थेची खरी संपत्ती. ही संपत्ती तुमच्याकडे किती आहे आणि तुम्ही ती कशी वापरता यावर संस्थेची खरी प्रगती अवलंबून असते. कोणतीही संस्था व्यक्तिकेंद्रित असून चालत नाही, ती कार्यकेंद्रित असावी लागते, समाजाभिमुख असावी लागते. लहान-मोठ्या सर्व कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारी, समाजाच्या बदलत्या गरजा ओळखणारी असावी लागते. याच गुणांमुळे आज 'सा' ची वाटचाल दीर्घकालीन विकासाकडे चालू आहे. पुण्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांना बळ देणारी, प्रेरणा देणारी होत आहे.

संस्थेचे विद्यमान अध्यक्ष अमृत बक्षी यांच्या नेतृवाखाली 'सा' ची वाढ आणि वाटचाल ही प्रबोधन, स्वमदत गट आणि पुनर्वसन अशा सर्व क्षेत्रांत वेगाने होत आहेच. तरी देखील पुण्यात सुरू झालेला हा प्रयोग सुदृढ करण्यासाठी 'सा' ला अजून बरीच वाटचाल करावयाची आहे. मानसिक आजारांविषयी समाजाचे प्रबोधन, रुग्ण आणि कुटुंबीयांना माहिती व आधार देणे आणि स्वमदतीचे महत्त्व अधोरेखित करणारी एक सक्षम व्यवस्था समाजात निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. अशी व्यवस्था मानसिक आजारांवरील तज्ज्ञांच्या उपचारांबरोबरच एक पूरक व्यवस्था(Complementary) म्हणून काम करू शकेल.

आज 'सा'च्या कार्याचा विस्तार झाला आहे. मानसिक आजारी व्यक्तींसाठी सा तर्फे पुनर्वसन केंद्र चालवले जाते. रोज ३५/४० मानसिक आजारी व्यक्ती या केंद्रात सकाळी १० ते ४.३० या वेळात येऊन केंद्रात चालणाऱ्या विविध ॲक्टीविटीजचा लाभ घेत असतात. 'सा'तर्फे पुण्यात आणि पुण्याबाहेर असे एकूण तीन गट चालवले जातात. पुण्यात आणि पुण्याबाहेर शाळा, कॉलेजेस, ज्येष्ठ नागरिकांचे गट, महिलांचे गट, गृहनिर्माण संस्था अशा विविध ठिकाणी जनजागृतीचे कार्य केले जाते. 'सा' च्या जन-जागृतीच्या आणि पुनर्वसनाच्या कार्यासाठी ५/६ कर्मचारी वर्ग आणि सुमारे तीस एक स्वयंसेवक तळमळीने काम करत असतात.

मानसिक आजारी व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांना आधार देणारी एक व्यवस्था समाजात निर्माण व्हायला पाहिजे या 'सा' च्या उद्दिष्टांच्या दिशेने 'सा' ची वाटचाल चालू आहे आणि चालूच राहणार आहे. अर्थात या प्रवासात रुग्ण, कुटुंबीय, मनोविकार तज्ज्ञ आणि सर्वसामान्य नागरिक अशा सर्वांचीच मदत आवश्यक ठरणार आहे.

**- प्रा. डॉ. अनिल वर्तक**

उपाध्यक्ष, स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन (सा), पुणे

भ्रमणध्वनी - ९५०३७१०८५९

Email : avartakyahoo.com

शहाणे होण्यापेक्षा नशीबवान होणे जास्त बरे. - डब्ल्यू. जी. बेनहॅम

# वैशाख महिना

*वैशाख महिन्यातील सणांबद्दलचा लेख - संपादक*

या महिन्यात येणारे सण म्हणजे अक्षय तृतीया नरसिंह जयंती आणि भावुका अमावस्या. वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय्यतृतीया असे म्हणतात. अक्षय्यतृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त समजला जातो. जैन धर्मामध्येही या दिवशी व्रत करण्याचे विशेष महत्त्व सांगितले आहे. या दिवसाला 'आखा तीज' असेही म्हटले जाते.

या दिवशी परशुराम जयंती, बसवेश्वर जयंती आणि हयग्रीवजयंती असते. या दिवशी भगवान व्यास यांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला सुरुवात केली. लेखनाचे काम गणपतीने केले.

या दिवशी भारताच्या उत्तराखंड राज्यातील बदरीनारायणाच्या बंद देवळाचे दार उघडतात आणि दिवाळीच्या भाऊबीजेच्या दिवशी ते बंद होते.

या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही म्हणून हिला अक्षय्यतृतीया असे म्हटले जाते.

देव आणि पित्तर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते ते अक्षय होते.

या दिवशी गंगेचे स्वर्गातून पृथ्वीवर अवतरण झाले अशीही आख्यायिका आहे.

अक्षय्यतृतीयेच्या शुभमुहूर्तावर लावलेल्या फळबाग भरघोस फळ देतात. आयुर्वेदिक औषधी वनस्पतीही अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर लावल्यास या वनस्पतींचा क्षय होत नाही, म्हणजेच त्यांचा तुटवडा भासत नाही.

हा दिवस पूर्वजांचे ऋण फेडण्याचा दिवस म्हणून पाळला जातो. पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात. या दिवशी मातीचे मडके आणून त्यात वाळा टाकतात. सुगंधित पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान करतात. जेवणही देतात. असे केल्याने पितरांचा संतोष होतो असे मानले जाते. बोलीभाषेत याला 'उन्हाळी पित्र' असेही म्हणतात.

या दिवशी ग्रीष्म ऋतूमध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या फळांचे व धान्याचे दान करावे.

साडे-तीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी नवीन घरात प्रवेश, नवीन वस्तू घेणे, आर्थिक व्यवहार करणे, दागिने घेणे ही शुभ कामेही केली जातात.

या शुभमुहूर्तावर शेतकरीही आपल्या कामाला लागतात.

महाविष्णू, लक्ष्मी व कुबेर यांचेही महत्त्व या दिवशी असते.

महाराष्ट्रातील स्त्रिया चैत्र शुद्धतृतीयेला चैत्रगौरीची स्थापना करतात. चैत्रातील एखाद्या दिवशी हळदीकुंकवाच्या निमित्ताने बायकांना घरी बोलावून आंब्याच्या दाळ, भिजवलेले हरभरे आणि पन्हे देतात. या गौरी उत्सवाचा अक्षय्यतृतीया हा शेवटचा दिवस असतो.

ब्राह्मणाला वाळा घातलेल्या पाण्याने कुंभदान करणे, स्त्रियांना कैरीचे पन्हे देणे यातही धार्मिक विधीबरोबर आरोग्य संदेशही असतो.

---

फार भरभराट झाली की, माणूस फार चोखंदळ बनतो. - बेंजामिन फ्रँकलिन

वातावरणात उष्मा वाढलेला असतो. शरीराचेही तपमान वाढते. पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यामुळे वारंवार तहान लागते. अशक्तपणा जाणवतो. हे सर्व त्रास कमी करण्यासाठी वाळ्याचे पाणी प्यावे. कैरीचे पन्हे प्यायले पाहिजे. त्या शरीराला थंडावा तर मिळतोच पण या गोष्टींमुळे सद्यतर्पण म्हणजेच लगेच तृप्त झाल्यासारखे वाटते. म्हणून या गोष्टी उन्हाळ्यात वारंवार केल्या पाहिजेत.

**नृसिंह जयंती**

वैशाख शुद्ध चतुर्दशीला नृसिंह जयंती साजरी केली जाते.

हिरण्यकश्यपू नावाचा एक बलाढ्य राजा होता. त्याचा भाऊ हिरण्याक्ष याला विष्णूने ठार केले होते. त्यामुळे हिरण्यकश्यपूचा विष्णूवर राग होता. हिरण्यकश्यपूला प्रल्हाद नावाचा एक मुलगा होता. तो सतत विष्णूचा 'नारायण नारायण' असा जप करत असे. त्यामुळे हिरण्यकशपूने त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. पण तो सफल झाला नाही. तो स्वतः आपल्या मुलाला ठार मारण्यासाठी शस्त्र घेऊन पुढे आला. त्यावेळी विष्णू नामस्मरणात प्रल्हाद रंगून गेला होता.वडिलांनी विचारले, ''तुझा विष्णू जर सर्वत्र आहे तर या खांबात आहे काय?'' प्रल्हादाने सांगितले, 'हो. विष्णू खांबातही आहे.'

हिरण्यकश्यपूने रागाने खांबावर जोरात लाथ मारली. त्यावेळी मोठा आवाज झाला आणि खांब दुभंगला. त्यातून अर्धा सिंह आणि अर्धा मनुष्य अशी नृसिंहाची प्रचंड आकृती बाहेर आली. तिने त्या हिरण्यकश्यपूला उंबरठ्यावर नेऊन मांडीवर आडवे घेतले आणि आपल्या तीक्ष्ण नखाने त्याचे पोट फाडून ठार केले. ही घटना वैशाख शुद्ध चतुर्दशीला घडली म्हणून लोक या तिथीस नृसिंह जयंती साजरी करू लागले.

नृसिंह जयंतीच्या आधी नऊ दिवस नवरात्र असते. नृसिंह जयंतीच्या दिवशी नववा दिवस येतो.

नृसिंह जयंतीच्या दिवशी मुलांना बोलावून कैरी पन्हे व भिजवलेली डाळ दिली जाते. दुसरे दिवशी पारणे असते. उपाध्यांना जेवावयास बोलावतात. सवाष्णींची खणानारळाने ओटी भरतात. रोज सकाळ संध्याकाळ नृसिंहाची पूजा व आरती केली जाते. पारण्याच्या दिवशी पेढे, खडीसाखर, ओले खोबरे प्रसाद म्हणून वाटले जाते. ओले खोबरे, खडीसाखर, पेढे या गोष्टी तृप्ती देणाऱ्या आहेत. तसेच शरीराचा दाह कमी करतात वारंवार लागणारी तहान कमी करतात.

तसेच प्रल्हादाप्रमाणे आपणही भगवंतांच्या नावावर परमश्रद्धा ठेवून नामस्मरण करावे.

**भावुका आमावस्या**

वैशाख आमावस्या ही भावुका आमावस्या म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी आपल्या घरच्या अंगणात कडू निंबाच्या डहाळ्याचा छोटासा मांडव घातला जातो. त्यात नदीतील सात गोटे आणतात व ते मांडवात मांडून पाच पांडव, द्रौपदी व कुंती असे मानून त्यांची पूजा केली जाते. त्यांना आंब्याच्या रसाचा नैवेद्य केला जातो. वनवासी पांडवांना घरी आणून त्यांची पूजा केली जाते.

कडूनिंबाची सावली अतिशय थंड असते. तसेच या काळात होणारे पित्त व कफाचे विकार कडूनिंबाने कमी होतात आणि आमरसामुळे त्याच्या गोड रसामुळे शरीरात वाढणारा वातही कमी होतो.

अशा या आरोग्यदायी गोष्टींशी सण आणि उत्सवाची सांगड आपल्या संस्कृतीने घातली आहे.

**– डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

●●●

गरज नसलेल्या चैनीच्या वस्तूंकरिता माणसे उगाचच घाम गाळतात. – सिनेका

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएचडी प्रदान



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात वृत्तविद्या व संज्ञापन विभागात कार्यरत असलेल्या प्रा. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांना दि १२ एप्रिल रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची इंग्रजी साहित्यातील पीएचडी प्रदान करण्यात आली. त्यांनी 'ए क्रिटीकल स्टडी ऑफ द मार्जिनलाईज्ड व्हॉइसेस इन द नॉवेल्स ऑफ अमिश त्रिपाठी, देवदत्त पट्टनायक अँड आनंद निलकंठण' या विषयावर डॉ. दीपाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध लिहिला.

भारतीय इंग्रजी साहित्य इ.स. २००० नंतर वेगवेगळ्या विषयाला हात घालत आहे. या मध्ये अमिश त्रिपाठीच्या शिवा ट्रीलॉजी व देवदत्त पट्टनायक यांच्या भारतीय पुराणकथांवर आधारित पुस्तकांनी युवा पिढीला अक्षरशः वेड लावले आहे.

प्रा. धर्माधिकारी यांनी भारतीय इंग्रजी साहित्यातील नुकत्याच प्रसिद्धी पावलेल्या अमिश त्रिपाठी, देवदत्त पट्टनायक व आनंद निलकंठण यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास पीएचडीच्या प्रबंधासाठी करून नवसाहित्यात चिकित्सक दृष्टीने भर घातली आहे. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक व वृत्तविद्या व संज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१) प्रात्यक्षिक परीक्षा : प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा खालीलप्रमाणे घेण्यात आल्या.

| अ.क्र | | वेळ | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा (प्रथम, द्वितीय आणि तृतीय) | दु.२.३० ते सायं.५.३० | २/४/२०१९ |
| २. | सबमिशन (तृतीय विधी वर्ष) आणि मूट कोर्ट | सायं. ५.०० ते ७.०० | ११-१२-१५/४/२०१९ |
| ३ | क्लाईंट काऊंन्सेलिंग (द्वितीय विधी वर्ष) | सायं. ४.०० ते ७.०० | ८/४/२०१९ |
| ४. | ग्रुप डिस्कशन (प्रथम विधी वर्ष) | सायं. ४०० ते ७.०० | ८/४/२०१९ |
| ५. | प्रॅक्टीकल जनरल सबमिशन | सायं. ४.०० ते ७.०० | ८/४/२०१९ |

आपणापैकी प्रत्येकामध्ये युगायुगाचा इतिहास सामावलेला आहे. - जॉन मोर्ले

## २) सराव परीक्षा

दिनांक १५, १६, १८ आणि २० एप्रिल, २०१९ दरम्यान दुसऱ्या, चौथ्या व सहाव्या सत्राची सराव परीक्षा खालील प्रमाणे घेण्यात आली.

| दिनांक | | | प्रथम विधी वर्ष | द्वितीय विधी वर्ष | तृतीय विधी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १५/४/२०१९ | सोमवार | १.३०-४.०० | भारतीय दण्ड अधिनियम | न्यायत्वशास्त्र | - |
| | | ४.३०-७.०० | भारताचे संविधान | जमिनी विषयक कायदे | साक्षीपुरावा कायदे |
| १६/४/२०१९ | मंगळवार | १.३०-४.०० | कौटुंबिक कायदे-एक | करार कायदे-दोन | बँकिंग आणि इन्शुरन्स |
| | | ४.३०-७.०० | पर्यावरण विषयक कायदे | वैकल्पिक | विमा विषयक कायदे |
| १८/४/२०१९ | गुरुवार | ४.३०-७.०० | - | - | लॉ ॲण्ड मेडिसिन |
| २०/४/२०१९ | शनिवार | १.३०-४.०० | - | - | महिला आणि बालकांविषयीचे कायदे |
| | | ४.३०-७.०० | - | - | बौद्धिक संपत्ती कायदा |

## ३) संसदीय वादविवाद

महाविद्यालयाने दिनांक १० एप्रिल, २०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी संसदीय वादविवादाचे आयोजन केले होते. यामध्ये एकूण २६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. नियमावली बनवून सत्तापक्ष व विरोधी पक्ष अशी १५ व १० अनुक्रमे अशी वाटणी करून त्या माधमांतून प्रधानमंत्री, संसदीय कार्यमंत्री तसेच विरोधी पक्ष नेता व उपनेता अशी निवडणूकीच्या माध्यमातून निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना लोकप्रतिनिधी कायदा विधेयक चर्चेसाठी देण्यात आले होते. यावेळी संसदेप्रमाणे वर्गाची निर्मिती करण्यात आली. प्रवीण गांधी महाविद्यालयाच्या प्रा. कविता शर्मा या पर्यवेक्षक म्हणून हजर होत्या. तसेच अंतर्गत पर्यवेक्षक म्हणून प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार व प्रा. विनोद वाघ हे होते.



### ४) वार्षिक बक्षीस वितरण समारंभ

दिनांक ११ एप्रिल, २०१९ रोजी वार्षिक बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी न्यू विधी महाविद्यालय मुंबईचे प्राचार्य श्री. एन. एम. राज्याध्यक्ष हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. एम. एम. राजाध्यक्ष हे विधी विभागाचे अध्यक्ष, तसेच विधी विभागाच्या अभ्यास केंद्राचे प्रमुखही आहेत.

यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सांस्कृतिक व खेळ या स्पर्धेसाठी पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात आली.

खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

१) कै. श्री. गुणाकर जोशी रोख बक्षीस

२) कै. श्री. विजू नाटेकर रोख बक्षीस

३) कै. श्री. बी. एस. बागडे रोख बक्षीस

४) कै. श्री. एम. एन. पाटील रोख बक्षीस

५) श्री. दामोदर विनायक पेंडसे बक्षीस




### ५) पुनर्तपासणीचा निकाल

सत्र १ ते ४ ची परीक्षा डिसेंबर २०१८ ते जानेवारी २०१९ मध्ये घेण्यात आली होती व फेब्रुवारीमध्ये त्याचा निकाल लावण्यात आला होता. अनेक विद्यार्थ्यांना पुनर्तपासणीसाठी अर्ज केला होता. याचा निकाल दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजी लावण्यात आला.

### ६) १५ वे डॉ. वा. ना. बेडेकर स्मरणार्थ व्याख्यान

दि. १४ एप्रिल २०१९ रोजी माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ जयप्रकाश प्रधान, वरिष्ठ पत्रकार लोकसत्ता यांचे 'बातमी मागची बातमी' या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक हजर होते. तसेच संध्याकाळी संगीत व भजनांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

### ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, कार्यक्रम

महाविद्यालयामध्ये दिनांक १५ एप्रिल २०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यातील अनेक पैलूंवर आपले विचार मांडले. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार व प्रा. विनोद वाघ यांनीही यावेळेस डॉ. आंबेडकर व संविधान व इतर कायदे या विषयावर चर्चा केली. सर्वांनी संविधानावर झालेली चर्चा वाचावी असे आवाहन प्रभारी प्राचार्यांनी केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय विधीची पलक गुप्ता हिने केले. तर विद्यार्थी विनोद चव्हाण यांनी फोटोस हार अर्पण केले.

८) दिनांक १२ एप्रिल २०१९ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व प्राचार्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. विषय : TCS Courses.

### ९) निवडणूक कर्तव्य (एप्रिल २०१९)

महाविद्यालयाच्या पुढील कर्मचाऱ्यांना निवडणुकीसाठी नेमण्यात आले होते.

| अ.क्र. | नाव | पद | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती शितल सोनावणे (ग्रंथपाल) | प्रथम मतदान अधिकारी (FPO) | १४८/१५४ राबोडी, ठाणे |
| २. | श्री. विनोद ह. वाघ (सहायक प्राध्यापक) | अध्यक्ष (PRO) | १४८/३०४ आंबेडकर रोड, ठाणे |
| ३. | श्री. मुकेश राणे (कनिष्ठ लिपीक) | अध्यक्ष (PRO) | १५१/२३० नेरुळ |
| ४. | श्री. संतोष झुगरे (ग्रंथालय सहाय्यक) | शिपाई | ठाणे |
| ५. | श्री. राकेश पाथरे, शिपाई | शिपाई | १४८/१०१ ढोकाळी, ठाणे |
| ६. | श्रीमती रंजन करंदीकर (प्रभारी कार्यालय अधीक्षक) | इतर मतदान अधिकारी (OPO-3) | १४८/१ पाचपाखाडी, ठाणे |

१०) भारतीय अधिवक्ता मंडळ विधी महाविद्यालयाची तपासणी करून त्यांना मान्यता देत असते. यासाठी रुपये तीन लाख पन्नास हजार एवढी फी आकारली जाते. जरी महाविद्यालयास कायम स्वरूपी मान्यता असली तरी पुढील मान्यता मिळावी म्हणून दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजी आवश्यक त्या कागदपत्रांसह बार काउंन्सिल ऑफ इंडिया यास अर्ज पाठवण्यात आला आहे.

११) दिनांक २४ एप्रिल २०१९ पासून सत्र १ व २ च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा पत्र देण्यात आले.

१२) दिनांक २७ एप्रिल २०१९ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फोटो सेशन ठेवण्यात आले. यावेळी कामगार न्यायालयाचे माजी न्यायाधीश सदाशिव देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे फोटो घेण्यात आले व नंतर त्यांना ॲड. देशमुख व प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार व इतर प्राध्यापकांनी शुभेच्छा दिल्या.

१३) प्रथम विधीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठीमध्ये शिकवणी वर्ग आयोजित करण्यात आले होते. यासाठी प्रा. विनोद वाघ, प्रा. हेतल मिशेरी, प्रा. दातार व ॲड. गायकवाड यांनी दिनांक १८ ते २६ एप्रिल दरम्यान दुसऱ्या सत्राच्या चारही विषयांवर शिकवणी घेतली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**एप्रिल २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**

१ एप्रिल – ६ एप्रिल : ब्रीम्स चे प्रथम वर्ष पीजीडीएम विद्यार्थी, डॉ. नीतिन जोशी, प्रा. दीप्ती पेरीवाल आणि प्रा. कृणाल पुंजानी यांनी ब्रीम्स ग्लोबल इमर्शन प्रोग्रामचा भाग म्हणून आंतरराष्ट्रीय औद्योगिक सहलीसाठी सिंगापूरला भेट दिली.



१ ते ३ एप्रिल: प्रा. संदीप मोघे एआयसीटीई, नवी दिल्ली येथे आयोजित डिजिटल पेडागॉगी - चेंजिंग माइंडसेट फॉर सस्टेनेबल लर्निंग (Digital Pedagogy-Changing Mindsets for Sustainable Learning) विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहिले.




९ एप्रिल : डॉ. पल्लवी चांदवस्कर यांना सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पवई येथे एमएमएस च्या ४थ्या सत्राच्या तोंडी परीक्षेसाठी बाह्य परीक्षक म्हणून निमंत्रित करण्यात आले.

एमएमएसच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी श्री अंबिका योग कुटीर यांच्या सहयोगाने ब्रीम्सतर्फे आयोजित केलेल्या तीन महिन्यांच्या योग प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. अभ्यासक्रमाच्या सांगता समारंभात विद्यार्थ्यांनी योग आसनांचे प्रदर्शन केले आणि प्रमाणपत्रे प्राप्त केली.



१० एप्रिल: एम.एम.एस. विद्यार्थ्यांसह डॉ. सुखदा तांबे यांनी महात्मा गांधी भजन संध्या आयोजित केली.



१३ - १४ एप्रिल: चितकारा विद्यापीठा तर्फे आयोजित बँकिंग आणि वित्त परिषदेसाठी डॉ. स्मिता जपे यांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. स्मिता जपे यांनी अॅनॅलिसिस अँड व्हॅलिडिटी ऑफ फिनान्शिअल परफॉर्मन्स पॅरामीटर्स ऑफ द आर. ओ. इ. युसिंग ड्यू पॉईंट मॉडेल : स्टडी ऑफ पब्लिक लिमिटेड कंपनी (Analysis and Validity of financial performance parameters of the ROE using DuPont Model : A study of Public limited Companies) या विषयावर शोधनिबंध सादर केला.



१८ एप्रिल: डॉ. नीतिन जोशी यांनी जोशी बेडेकर महाविद्यालयात Clarity of Purpose या विषयावर व्याख्यान दिले.

२० एप्रिल: श्री. अशोक माने, यांच्यासह डॉ. नीतिन जोशी यांनी टीसीएस येथे सर्व संस्थां प्रमुखांच्या बैठकीत भाग घेतला.

डॉ. मीनाक्षी आणि प्रा. सिद्धेश यांनी पीजीडीएम प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फिनॅक गेमची लर्नबीझ सिम्युलेशन टूर्नामेंट आयोजित केली.

२४ एप्रिल: डॉ. स्मिता आणि डॉ. मीनाक्षी यांनी एमएमएस द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मनी मॅनेजर गेमची लर्नबीझ सिम्युलेशन टूर्नामेंट आयोजित केली.

डॉ. नीतिन जोशी यांना गुजरात टेक्निकल युनिव्हर्सिटी अहमदाबाद येथे बाह्य परीक्षक म्हणून निमंत्रित करण्यात आले.

२५ एप्रिल: ब्रीम्स मध्ये संशोधन प्रकाशन गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने, संशोधक डॉ. स्मिता जपे , डॉ. पल्लवी चांदवस्कर, डॉ मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. कृणाल पुंजानी यांनी रिसर्च फोकस ग्रुप उपक्रमाचा प्रारंभ केला.

२७ एप्रिल: डॉ. स्मिता जपे आणि डॉ. सुखदा तांबे यांनी एमएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे फिनॅक आणि कस्टमर इज किंग या गेमची लर्नबिज सिम्युलेशन टूर्नामेंट आयोजित केली.

डॉ. मीनाक्षी, डॉ. पल्लवी आणि प्रा. कुणाल यांनी पीजीडीएम फायनान्स आणि मार्केटिंगच्या विद्यार्थ्यांसाठी लर्नबीझ सिम्युलेशन टूर्नामेंट आयोजित केली.



३० एप्रिल: प्लेसमेंट (रोजगार) विभागाने २०१८-२० च्या तुकडीच्या प्रथम वर्षाच्या एमएमएस आणि पीजीडीएम विद्यार्थ्यांसाठी १००% समर प्लेसमेंट्स (उन्हाळी प्रशिक्षण रोजगार) मिळविले. प्राप्त झालेल्या रोजगारांपैकी सर्वोच्च स्तरावरची छात्रवृत्ती रुपये १५,०००/- प्रति महिना आहे. अमूल, एलजी इलेक्ट्रॉनिक्स, फ्लिपकार्ट, मेरू कॅब या सारख्या चांगल्या ब्रॅण्ड्सना समर प्लेसमेंट्स (उन्हाळी रोजगार) साठी आमंत्रित करण्यात आले.

जी.एन.आय.एम.एस. ने डॉ. नीतिन जोशी यांना शिक्षक सदस्यांच्या मुलाखतीसाठी निवड समिती सदस्य म्हणून निमंत्रित केले.

डॉ. पल्लवी आणि डॉ. स्मिता जपे यांनी लिहिलेली रेमंड रेमेजीन्ड: ए केस स्टडी ही केस स्टडी फेब्रुवारी २०१९, यूजीसी मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय जर्नल (नियतकालिक) जे टी आर म्हणजेच (इंटरनॅशनल जर्नल ऑफ इमर्जिंग टेक्नोलॉजी आणि इनोवेटिव्ह रिसर्च) च्या विशेष अंकामध्ये प्रकाशित झाली.

डॉ. मीनाक्षी आणि एमएमएस द्वितीय सत्राची विद्यार्थीनी आरती विकमनी यांचा पेपरलेस मोबाईल तिकीट बुकिंग यूटीएस ॲप्लिकेशनः ठाणे क्षेत्राचा शोध घेणारा अभ्यास हा शोध निबंध फेब्रुवारी २०१९ मध्ये यूजीसी मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय जर्नल (नियतकालिक) जेईटीआयआर (इंटरनॅशनल जर्नल ऑफ इमर्जिंग टेक्नोलॉजी आणि इनोवेटिव्ह रिसर्च) च्या विशेष अंकामध्ये प्रकाशित झाला.

प्रा. कृणाल पुंजानी यांचा शोध-निबंध यूजीसी मान्यताप्राप्त जर्नल (नियतकालिका) मध्ये प्रकाशित झाला.

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

प्रासादिक वाटतात. सावरकरांची कविता सर्वस्वी निर्दोष नाही. ती अनेकदा क्लिष्ट झाली आहे. अर्थात हा क्लिष्टपणा व्युत्पन्नतेमुळे आणि विचार संघर्षतेमुळे आलेला आहे.'' वयाच्या पंधराव्या वर्षी सावरकरांनी 'स्वदेशीचा फटका' लिहिला. फटका हा काव्यप्रकार ज्येष्ठ कवी अनंत फंदी यांनी सिद्धहस्ताने वापरून प्रसिद्ध केला. सावरकर लिहितात :

'आर्यबंधू हो उठा उठा का मठासारखे नटा सदा।
हटा सोडुनी कटा करू म्लेंच्छ पटा ना धरू कदा।।
काश्मिराच्या शाली त्यजुनी अलपाकाला का भुलता।
मलमल त्यजुनी वलवल चित्ती हलहलके पट का वरिता।।

चाफेकर नि रानडे फाशी गेल्याची बातमी येताच सावरकरांनी सन १८९९ मध्ये 'चाफेकर नि रानडे यांजवरील फटका' रचला. या फटक्याच्या २९ व ३० कडव्यांच्या चार ओळीत सावरकरांनी शब्दाशब्दांच्या आद्याक्षरातून आपले नाव कसे चातुर्याने गुंफले आहे हे ध्यानात येईल. याच फटक्यात सावरकर म्हणतात :

'कार्य सोडुनी अपुरे पडलां झुंजत, खंती नका! पुढे।
कार्य चालवू गिरवत तुमच्या पराक्रमांचे आम्ही धडे।।'

सावरकरांनी आर्या, शार्दूलविक्रीडीत, इंद्रवज्रा, वसंततिलका इत्यादी वृत्त कवितेत वापरली आहेत. लोकमान्य टिळकांवर त्यांनी लिहिलेली आर्यावृत्तातील कविता 'श्रीटिळकस्तवन' नावाने प्रसिद्ध आहे.

१९०२ साली सावरकर फर्ग्यूसन कॉलेजात विद्यार्थी असताना 'आर्यसंघ' नावाच्या चौथ्या भोजनसंघामध्ये दर आठवड्याला म्हणण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रसिद्ध आरती लिहिली. 'जयदेव जयदेव जयजय शिवराया। या या अनन्यशरणा आर्यां ताराया।।' हे या आरतीचे ध्रुवपद।

सावरकरांनी सिंहगडाचा पोवाडा, बाजीप्रभु देशपांडे यांच्यावर देखील पोवाडा लिहिला व प्रसिद्ध पावला.

पुढे सावरकर १९०६ मध्ये बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला रवाना झाले. त्यावेळी समुद्र प्रवास बोटीने करावा लागे. लांबच्या या प्रवासात कित्येक दिवस खाली समुद्र नि वरती आकाश यावाचून काही दिसत नाही. सावरकरांना प्रियजनांचा विरह होतो व करमणूक म्हणून वादळी व निरभ्ररात्री ते बोटीच्या डेकवर फिरत. 'तारकास पाहून' नावाची त्यांची एक सुंदर कविता आहे. 'प्रियकर हिंदुस्थान' ही एक सुंदर कविता सावरकरांनी लंडन वास्तव्यात १९०८ साली लिहिली. त्यांच्या लंडनमधील वास्तव्यात सावरकरांचा पहिला मुलगा 'प्रभाकर' हा चार वर्षांचा होऊन लहानपणीच वारला. ती वार्ता त्यांना कळली तेव्हा दुःखगद्गद होऊन लंडन मुक्कामी 'प्रभाकरास' ही कविता लिहिली.

परिसुनि यौवन-लतिकेला तू पहिले फूल फुले।
तनया, तनु थरथरली स्नेहे नेत्र स्निग्ध झाले।।
परंतु अमुचे अभिनव यौवन, त्यांत पितृत्वाचा।
प्रथम समागम, गमुनी लज्जा-विनय मना साचा।।

सावरकर आपल्या दिवंगत पुत्रास म्हणतात की, 'क्रांतीच्या झंझावातात हे माझं हृदय व देह सापडला असून तुला राहण्यास सुरक्षित नाही. म्हणनू तुझी स्मृती चिरकाल सुरक्षित रहावी, वास्तव गोविंदसिंहांच्या पराक्रमाचा गौरव ज्या शीखांच्या इतिहासात आहे त्या इतिहासाचा मराठीत जो ग्रंथ मी लिहिला, तो तुझ्या नावे अर्पण करतो.' ही कविता सावरकरांनी शीखेतिहासाची अर्पणपत्रिका म्हणून लिहिली.

१९०९ साली ब्रायटनच्या समुद्र किनाऱ्यावर सावरकरांनी 'ने मजसी ने' ही जगप्रसिद्ध कविता लिहिली. 'अभिनव भारत' या संस्थेवर सरकारची वक्रदृष्टी झाल्यामुळे आपल्याला हिंदुस्थानात परत जाता येणार नाही व

पुस्तकांपेक्षाही माणसांचा अभ्यास जास्त आवश्यक आहे. - ला. रोशेफोकॉल्ड

आपण लवकरच धरले जाऊ असे सावरकरांना वाटले. त्यावेळी समुद्रकाठी 'सागरास' ही अजरामर कविता त्यांनी लिहिली. त्यातील काही मंतरलेल्या ओळी पुढीलप्रमाणे :

'नभी नक्षत्रे बहुत एक परि प्यारा। मज भरत भूमिचा तारा प्रासाद इथे भव्य परी मज भारी। आईची झोपडी प्यारी। तिजवीण नको राज्य, मजप्रिय साचा। वनवास तिच्या जरि वनिचा।।'

सावरकरांचे व्यवच्छेदक लक्षण हेच की, ते आपल्या सर्व प्रतिभेला, शिक्षणाला, मान सन्मानाला मातृभूमीच्या मुक्तीसाठी अर्पण करतात. जर मातृभूमीच्या उद्धारासाठी आपल्या 'गुणसुमनांचा' उपयोग होत नसेल तर हा 'विद्येचा भार' नको असे सावरकरांना वाटते.

जून १९०९ साली सावरकरांचे ज्येष्ठ बंधू गणेशपंत सावरकरांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झाली नि लवकरच पुढे त्यांचे धाकटे बंधू बाळ (डॉ. सावरकर) यांसही अटक झाली. या दोन्ही बातम्या गणेशपंताच्या पत्नी यशोदाबाई यांनी विनायक सावरकरांना इंगलंडला कळवल्या. तेव्हा संत्रस्त झालेल्या आपल्या भावजयीला सावरकरांनी काव्यमय पत्र लिहिले. 'सांत्वन' नावानी प्रसिद्ध झालेली ही कविता म्हणजे सावरकरांच्या प्रतिभेचा हुंकार :

''अनेक फुले फुलती। फुलोनिया सुकोन जाती।
कोणी त्यांची महती गणती। ठेविली असे?।।
परी जे गजेंद्रशुंडेने उपटिले। श्रीहरीसाठी मेले।
कमलफूल ते अमर ठेले। मोक्षदाते पावन।

अशीच सर्व फुले खुडावी। श्रीरामचरणी अर्पण व्हावी
काही सार्थकता घडावी। या नश्वर देहाची।।
अमर होय ती वंशलता। निर्वंश जिचा देवाकरिता
दिगंती पसरे सुगंधता। लोकहित परिमलाची।।''

सावरकर आपल्या भावजयीस सांगतात की, देशासाठी निर्वंश झाला तरीही चालेल, पण देशहित हे सर्वोपरी आहे. सावरकरांनी आपले जीवन मातृभूमीसाठी अर्पण केले होते.

मार्च १९०९ साली विनायक सावरकरांना पकडले गेले. तेव्हा या जन्मात जिची पुन्हा भेट होणे जवळ जवळ असंभवनीय झालेले होते ह्या आपल्या पूजनीय वहिनीस आपल्या अटकेच्या वृत्तकथनाचा कुठारघात करण्याचे कटुकर्तव्य करतानाच त्यातील उदात्त, आकर्षक, दिव्य मर्म व्यक्त करण्यास्तव विनायकरावांनी लंडनमधील ब्रिक्स्टन जेलमधून आपल्या या जन्मातला बहुधा शेवटचा होऊ पाहणारा हा निरोप – हे मृत्यूपत्र – लिहून धाडले. वसंततिलका वृत्तात लिहिलेले 'माझे मृत्यूपत्र' नावाचे काव्य म्हणजे सावरकरांच्या काव्यात्मप्रतिभेचा कळस आहे. त्यात सावरकर लिहितात की, जर आम्ही सात भाऊ असतो तरीही देशसेवेसाठीच प्राणार्पण केले असते. हे मातृभूमी! तुला संपूर्ण तन मन धनाने समर्पित होऊन देशकार्यार्थ माझी काया झिजू दे! असा सावरकरांचा ही कविता लिहिण्यामागचा हेतू –

'हे मातृभूमी! तुजला मन वाहियेले।
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले।
तूतेचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूंचि अनन्य झाला।।

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रियबाळ झाला
त्वत्स्थंडिली बघ अता मम देह ठेला
हे काय, बंधू असतो जरिसात आम्ही
त्वत्स्थंडिलीच असते दिधले बळी मी।।

की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने
लब्ध–प्रकाश इतिहास निसर्ग माने
जे दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे।।

आपल्या कवितेनी सावरकरांनी देशसेवा केली. प्रस्तुत अग्रलेखाचा उद्देश हा सावरकरांच्या बहुप्रसवा काव्यप्रतिभेला वंदन करण्याचा असून त्यांच्या समग्र कार्याचा आवाका घेणे म्हणजे दिव्याच्या ज्योतीने सूर्याला ओवाळण्यासारखे होईल.

दरवर्षी विद्या प्रसारक मंडळाच्या ऑक्सफर्ड, केंब्रीज व लंडन येथील अभ्यासदौऱ्यात सावरकर ज्या लंडनमधील 'इंडिया हाऊस' या वास्तुत बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी राहिले तेथे जाण्याचा योग येतो. यावर्षी मात्र विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र मंडळ, लंडन व विद्या प्रसारक मंडळाच्या लंडन अकॅडमी ऑफ इज्युकेशन व रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ मे २०१९ रोजी लंडन येथील महाराष्ट्र मंडळाच्या सभागृहात 'Swatantryaveer Vinayak Damodar Savarkar's Poetic Genius : (His compositions during his stay in London 1906-1910') हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी २९ विद्यार्थ्यांचा चमू इंग्लंडला जात आहे व सावरकरांवरील कार्यक्रम सादर करीत आहे याचा एक वेगळाच दुग्धशर्करायोग म्हणायला हवा -

मात्र मागच्या आठवड्यातच राजस्थान व मध्यप्रदेशच्या नवीन सरकारांनी सावरकरांच्या संदर्भात आक्षेपार्ह बदल पाठ्यपुस्तकात करवल्याची बातमी वाचण्यात आली. सावरकरांची 'वीर' ही पदवी पाठ्यपुस्तकातून काढण्यात आली. एका 'मोठ्या' पक्षाचा अध्यक्ष सावरकरांवर आक्षेपार्ह विधान करतो. मनिशंकर अय्यर यांची तर अंदमानातील सावरकरांची स्मृती पुसून टाकण्यापर्यंत मजल गेली. सावरकर ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे होते म्हणून त्यांच्या देशप्रेमावर शंका निर्माण करणाऱ्या लोकांसंदर्भात न बोललेलेच बरे. खुद्द सावरकरांना देखील याची कल्पना होती. त्यांनी आपल्या संसाराची राखरांगोळी देशसेवेसाठी केली व तीही निरपेक्ष भावाने. सावरकरांसारखा क्रांतदर्शी हा पुढच्या पीढीसाठी निःसंशय दीपस्तंभासारखा मार्गदर्शक राहील.

स्वराज्य या नियतकालिकेत दि. १९ मार्च २०१५ रोजी विक्रांत पांडे यांनी 'Savarkar : The Unsung Peot' हा लेख लिहिला. त्यात ते म्हणतात-

"The Indian Government after Independence deliberately ignored Savarkar and did not honour him as should have been his due. As an American author said,"Sometimes your Light Shines so bright that it blinds people from seeing who you really are."

उपरोक्त 'नवनेत्यांना' सावरकरांचे समग्र दर्शन घडो हीच सावरकरांच्या १३६ व्या जन्मदिनी परमेश्वराकडे प्रार्थना...

**- डॉ. प्रशांत पु. धर्माधिकारी**

•••

दिशा
नियमित
वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.